[ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळीची ग्रंथमाला—ग्रंथ १२ वा.]

वक्तृत्वकला.

संपादक,

रा. रा. लक्ष्मण त्र्यंबक पारनाईक,

वकील—औरंगाबाद.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी—बडोदें.

सन १८९९

किंमत १ रुपया.

बडोदें,–"पूर्णचंद्रोदय" छापखान्यांत छापिला.

अर्पणपत्र.

दी ऑनरबल

श्री. नारायणराव बाबासाहेब घोरपडे

इचलकरंजी संस्थानचे अधिपति

मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद

यांस सेवेशीं

त्यांच्या वक्तृत्वकलाभिज्ञतेचें द्योतक म्हणून

हें पुस्तक

बहुमान पुरःसर अर्पण केलें आहे.

ल. त्र्यं. पारनाईक.

प्रस्तावना.

इतर प्राण्यांपेक्षां मानवी प्राणी ज्या गुणांनीं श्रेष्ठ गणला जात आहे त्यांपैकीं वाचा हा एक गुण आहे. तेव्हां, बोलता येणें हा मनुष्यमात्राचा स्वाभाविक गुण झाला; परंतु ज्या बोलण्यापासून आपलें वजन दुसऱ्यांवर पडून त्यांचें चित्त आपल्याकडे आकर्षण केलें जाईल, व आपल्या मनोगताचा ठसा त्यांचे अंतःकरणावर उत्तम रीतीनें उमटेल, त्याच भाषणाच्या असाधारण प्रकारास 'वक्तृत्व' अशी संज्ञा आहे.

या आर्यभूमीच्या फार प्राचीनकाळच्या इतिहासांत देखील वक्तृत्वाचा मासला सुदैवानें आपणास वाचावयास सांपडत आहे. रावणाच्या सभेंत जाऊन अंगदानें जी शिष्टाई केली, तिचें चटकदार वर्णन रामायणांत आहे. तसेंच खुद्द श्रीकृष्णानें दुर्योधनसभेंत जाऊन पांडवांच्या तर्फेनें जो उपदेश त्या गर्विष्ठ राजास केला, तो महाभारतांत वर्णिलेलाच आहे. मधल्या काळांत (middle ages) या वक्तृत्वगुणाचा प्रादुर्भाव भिन्न भिन्न रूपानें होऊं लागला. व्यासपीठावर बसून पुराणिकबुवा नवरसांनीं ओतप्रोत

भरलेलें पुराण सांगूं लागले व तें ऐकून श्रोत्यांचीं अंतःकरणें तल्लीन होऊं लागलीं. त्याचप्रमाणें हरदासांचा वर्ग उत्पन्न होऊन, कीर्तनद्वारें ते आपल्या वाक्चातुर्यानें समाजास धर्म व नीतीचें शिक्षण देऊं लागले. कविकुलगुरू कालिदासाचे वेळेपासून नाट्यकलेला जोर येऊन त्या रूपानें ही वक्तृत्व चमकूं लागलें. एकंदरींत प्राचीनकाळीं गीर्वाण भाषेंत जो प्रचंड ग्रंथसंचय झाला, व मधल्या काळांत मोरोपंतादि कवींनीं जो प्राकृतांत संग्रह केला, त्या ग्रंथांच्या परिशीलनानें निरनिराळ्या मंडळीमध्यें स्फूर्ति उत्पन्न होऊन, तिचा वाक्प्रवाह श्रोत्यांचीं कर्णरंध्रें पुनीत करण्यास कारणीभूत झाला.

याप्रमाणें कांहीं ठिकाणीं जरी वक्तृत्व झळकत होतें, तरी त्याची स्थिति अशोधित धातूप्रमाणें होती. सुवर्णमयी मृत्तिकेपासून बावनकसी सोनें काढण्यास जशी खटपट करावी लागते, तशा प्रकारची खटपट, साहित्य व व्याकरण शास्त्राप्रमाणें शुद्ध वक्तृत्वासही शास्त्रीय पद्धतीनें नियमबद्ध करण्यामध्यें आपल्या पूर्वजांची झाली नाहीं, हें देशाचें दुर्दैवच समजलें पाहिजे. परंतु यासंबंधानें भारतीयांस फारसा दोष देतां येत नाहीं, कारण त्या वेळची परिस्थितीच तशा प्रकारची होती. राजाविषयीं ‘ ना विष्णुः पृथिवीपतिः ’ अशी प्रजेची दृढतर समजूत प्राचीनकाळापासून चालत आल्यामुळें, आणि ‘ स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ’ या कालिदासोक्तीप्रमाणें बहुशः राजेलोकांचें वर्तन असल्या कारणानें, राजा व प्रजा यांच्यांत हक्काच्या संबंधानें वादच उत्पन्न होत नसे; व त्यामुळें राजशक्तीचा योग्य

प्रतिकार करण्याला समाजशक्ति असली पाहिजे या कल्पनेचा गंधही त्या वेळीं नव्हता.

समाजशक्ति उत्पन्न होण्यास वक्तृत्वशक्ति किती आवश्यक आहे, हें प्राचीन ग्रीक व रोमन राष्ट्रांस कळून चुकलें होतें, आणि ह्मणूनच त्या ठिकाणीं या कलेचा उद्भव झाला. तेथें ती इतक्या कळसास जाऊन पोहोंचली होती कीं, त्या देशांतील सुप्रसिद्ध वक्ते डिमॉस्थनीस व सिसेरो यांच्या तोडीचे अद्याप कोणी निपजले नाहींत; फार तर काय, पण हल्लीं उपलब्ध असणारीं त्यांचीं व्याख्यानें नुसतीं वाचून जो मनावर ठसा उमटतो व मनोविकारांचें उद्दीपन होतें, तसा प्रकार सांप्रतच्या जाड्या वक्त्यांच्या व्याख्यानश्रवणापासून होत नाहीं! याला एक कारण सांगण्यांत येत आहे—व विचारांतीं तें खरें ठरतें—कीं त्या काळीं 'विकाराचें' प्राबल्य होतें, हल्लीं 'विचाराचें' आहे, ह्मणून या दोहींची सांगड वक्तृत्वांत घालणें कठिण होऊन पूर्वीचें रूप त्याला आणतां येत नाहीं.

आधुनिक पाश्चात्य राष्ट्रांनीं तरी याच ग्रीक व रोमन विद्येच्या पायावर आपआपल्या इमारती बांधल्या आहेत; व त्यांच्याद्वारें आह्मा भारतीयांस या अप्रतिम कलेचें दिग्दर्शन झालें आहे. हिंदुस्थानचा पहिला व्हाइसरॉय वॉरन हेस्टिंग्स यानें आपल्या कारकीर्दींत जीं अनन्वित जुलमी कृत्यें केलीं होतीं, त्याबद्दल विलायतेस पार्लमेंटमध्यें चौकशी चालली असतां, एके दिवशीं बर्कनें दोषाविष्करणार्थ जें जोरदार व हृदयद्रावक भाषण केलें, तें ऐकून प्रत्यक्ष आरोपी हेस्टिंग्सचें अंतःकरण कळवळून गेलें, छाती भरून

आली, व ' माझ्यासारखा दुष्ट व नीच कर्म करणारा साऱ्या दुनयेंत कोणी नसेल ' असे उद्गार त्यानें काढिले, मग त्या प्रचंड वक्त्याच्या भाषणानें इतर श्रोतेमंडळीच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना देखील करणें कठिण आहे !

सांप्रतकाळीं आपली राजभाषा इंग्रजी असल्यामुळें, तिचा अभ्यास झपाट्यानें सुरू आहे, व आंग्लविद्यापारंगत विद्वानांमध्यें बंगाल्यांतील सन्मान्य गृहस्थ ना. सुरेंद्रनाथ बानर्जी, व मुंबई इलाख्यांतील ना. फेरोजशहा मेथा हे आमचे आधुनिक डिमॉस्थनीस व सिसेरो, इंग्लंड व हिंदुस्थानांतील संभाषणपीठें (Plat-form) आपल्या अलौकिक वक्तृत्वानें दणाणून सोडीत आहेत, हें पाहून किंवा ऐकून कोणा आर्यपुत्रास सानंद अभिमान वाटणार नाहीं !

परंतु इंग्रजी भाषेचा व्यासंग जास्त होऊं लागल्यामुळें एक अनिष्ट परिणाम घडून आला; तो असा कीं, देशी भाषेवरून लोकांचें लक्ष उडत चाललें, साधारण बोलण्याचालण्याच्या व्यवहारांत देखील लोक धेंडगुजरी भाषा वापरूं लागले. जन्मभाषेची अशी अवहेलना होत चाललेली पाहून कांहीं दूरदर्शी विद्वानांचें लक्ष तिच्या उन्नतीकडे लागलें; व तत्संबंधानें त्यांचे श्रम अव्याहत चालू आहेत ही अभिनंदनीय गोष्ट होय.

प्रो. थॉरोचें असें ह्मणणें आहे कीं, ' मनास जितक्या अंशानें (तद्देशीय भाषाद्वारें) शाब्दिक बोध प्राप्त होतो, तितक्याच अंशानें त्याचा विकास होत जातो. परकीय भाषाद्वारें हें प्राप्त होऊं शकत नाहीं. आईच्या मांडीवर

बोलतांना व खेळतांना जी भाषा आपण शिकतों, तिच्यांतच आपली सर्व भावी वृत्ति–भावना व विचारमय जीवन गोविलें जातें. * * * * ज्या ज्या इतर भाषा आपण शिकूं त्या सर्व आपल्या स्वभाषेच्या संबंधानें गौणच असतील.'

या नियमास अनुसरून महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभिवृद्ध्यर्थ, जे अनेक दिशांनीं प्रयत्न चालले आहेत ते पाहून आपणही यथाशक्ति हातभार लावून तिची अल्प सेवा करावी या हेतूनें बीटनकृत 'आर्ट ऑफ पब्लिक स्पीकिंग'चें मी हें भाषांतर केलें आहे.

आजपर्यंत वक्तृत्व विषयावर एक दोन पुस्तकें मराठींत झालीं आहेत, परंतु त्यांत या कलेसंबंधानें सविस्तर माहिती नसल्यामुळें महाराष्ट्र वाचकांस त्यांपासून व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. मुंबई इलाख्यांत वक्तृत्वोत्तेजक सभा कांहीं प्रसिद्ध ठिकाणीं स्थापन झाल्यास बरींच वर्षें होत आलीं, परंतु ज्या हेतूनें त्यांचा पाया रचिला गेला तो अद्यापि साध्य होत नाहीं; व नावाजण्यासारखा एकही मराठी वक्ता तयार झाला नाहीं. नळपाक तयार करून उत्तम भोजन घालणारास अमुक बक्षीस मिळेल असें आपण ह्मणतों मात्र; पण जर त्या पाकनिष्पत्ति करणारास सूपशास्त्र अवगत करून दिलें नाहीं, तर आपली ती इच्छा कशी तृप्त होणार ?

युरोप व अमेरिकेंत वक्तृत्वाच्या शाळा आहेत, हिंदुस्थानांत तशी एकही नाहीं. तेव्हां तशी परिस्थिति येई-

पर्यंत निदान साहित्य तरी जमा करून ठेवण्याचे उद्योगास लागलें पाहिजे, असें जाणून मी जो हा अल्पारंभ केला आहे, तो लोकादरास पात्र होवो, अशी जगन्नियंत्यास प्रार्थना आहे.

मुक्काम औरंगाबाद,
ता. १ जून १८९९ इ.

ल. त्रि. पा.



अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.

विषय. पृष्ठ.

वक्तृत्वकला.

भाग १ ला.

उपोद्घात.

मनुष्याच्या अंगीं अशी कांहीं शक्ति असावी, कीं तिच्या योगानें त्यास दुसऱ्यावर आपलें वजन सहज पाडतां येईल; आणि असें असेल तरच तो जीवंत राहिल्याचा उपयोग आहे. त्याचे नैसर्गिक आणि संपादन केलेले गुण कितीही चांगले असोत, त्याच्या चांगलेपणाची परीक्षा त्याच्या त्या शक्तीच्या योगानेंच विशेष होण्यासारखी असते. गुणाची पारख बहुधा अशी आहे कीं, ज्या गुणाचें तेज जगावर पडेल, तोच गुण चांगला. शारीरशक्ति, द्रव्य आणि विद्या हीं आपल्याजवळ असणें चांगलें खरें; परंतु कधीं? दुसऱ्यावर वजन

पाडण्याकडे यांचा उपयोग करतां आला तर, एरवीं नाहीं. पहा कीं आपण द्रव्याचा नुसता संचय करून ठेविला, आपल्या अंगची विद्या प्रकट न करितां तशीच झांकून ठेविली, आणि आपलें सामर्थ्य कोणास कळूं दिलें नाहीं, तर तें द्रव्य, ती विद्या, आणि तें सामर्थ्य, आपल्याला असून तरी काय उपयोग? ह्या सर्व गोष्टी आपल्याला अनुकूळ असूनही, जर आपलें तेज जगावर पडत नाहीं, तर त्या आपणापाशीं असूननसून सारख्याच आहेत. अंगीं मोठे मोठे गुण आहेत, पण त्यांचा प्रभाव पडून आपल्याला जगावर उत्तम प्रकारचा बस बसवितां येत नाहीं, तर आपण खरोखर मेल्याहून मेलेले आहों.

दुसऱ्याचें मन आकळन करून घेण्याच्या शक्तीसारखी शक्ति दुसरी कोणतीच नाहीं. तेव्हां ही शक्ति अंगीं असणें फार उपयोगाचें आहे.

दुसऱ्याचें बरेंवाईट करण्याचें आपल्या हातांत असणें, त्यांचे विचार सुमार्गाला लावणें, व त्यांचा स्वेच्छाचारीपणा घालवून त्यांचीं मनें आपल्या ताब्यांत ठेवणें, वगैरे कृत्यें करण्याचीं ईर्षा अगदीं स्तुत्य होय. ती पुरी करण्यास एखाद्यास अविश्रांत श्रम करून रात्रंदिवस जरी खपावें लागलें, तरी त्याचा विधिनिषेध न बाळगतां तो तें काम मोठ्या आनंदानें करील. खऱ्या वक्त्याच्या अंगीं दुसऱ्याचें मन आपल्याकडे ओढून घेण्याची शक्ति पूर्णपणें वास करीत असते. एका प्राचीन कवीनें म्हटलें आहे कीं, वक्तृत्वशक्ति ही सर्व जगाची राज्यकर्त्री होय. विशेषेंकरून याच शक्तीच्या योगानें सर्व काळीं राष्ट्रें सुयंत्र चालत आलीं आहेत;

आणि एकंदर सर्व जगाचा इतिहास पाहिला असतां, त्यांत-देखील या शक्तीचेंच महत्व दिसून येतें. तेव्हां जगाचा इतिहास ह्मणजे वक्तृत्वकलेवर झालेलें एक भाष्य आहे, असें ह्मटलें असतां चालेल. ज्या ज्या ह्मणून इतिहासप्रसिद्ध उलाढाली झाल्या आहेत त्यांचें कर्तृत्व वक्त्याकडेच येऊन पोहोंचतें. चोहोंकडे देशाभिमान प्रज्वलित करून लोकांत उत्साह आणि आवेश उत्पन्न करणारा तरी तोच; त्याच्याच खटपटीनें राज्यांतील जुलमाचे प्रकार बंद होऊन सरळ अशी राजनीति अस्तित्वांत येत आहे; त्यानेंच लोकांची धर्मश्रद्धा जागृत केली आहे; प्रसंगविशेषीं त्यांच्यांत तंटेबखेडे आणि द्वेषबुद्धी उत्पन्न करून पुनः त्यांचा उपशम करण्याचें अघटित कर्म करणारा तरी तोच बहाद्दर आहे. करणारापेक्षां बोलणाराचें महत्व कमी वाटत असतें, परंतु समयविशेषीं बोलणाराच फार महत्वाचीं कृत्यें करितो. बोलणारा किंवा प्रोत्साहक नसता, तर त्या करणाऱ्यांच्या हातून कांहींच झालें नसतें; फार तर काय, पण तें करण्याचा विचारदेखील त्यांच्या मनांत आला नसता. ‘ मौनं सर्वार्थसाधनं ’ किंवा ‘ सबसे चुप भली, ’ असें नेहमीं लोक ह्मणतात. पण ही ह्मण येथें लागू पडत नाहीं. कांहीं कांहीं प्रसंगीं ती खरी ठरते; तरी पण ज्यांत करणारापेक्षां बोलणाराची सरशी होत असते, असे थोडे का प्रसंग आहेत !

वर निर्दिष्ट केलेल्या शक्तीची कीर्ति ही सहचारिणी आहे. ज्याला ह्मणून लोकांवर आपलें वजन पाडतां येतें त्याची मोठी कीर्ति होते; व तशी कीर्ति आपली व्हावी असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. त्याला कीर्तीची मोठी

होत असते, असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं. वजन पडल्यावर कीर्ति होते हें तर आहेच; पण तसें वजन पडल्यानें लोक पुढें आपलें नांव घेतील, आपली कीर्ति अजरामर राहील, असें एकदां वाटूं लागलें ह्मणजे मग काय! अंतःकरण प्रसन्न होऊन मनुष्यास एकपट तेथें दुप्पट श्रम करण्याचा हुरूप येतो. शक्तीच्या सभोंवतीं कीर्तीचें वेष्टन असतें. त्याशिवाय शक्ति निरर्थक होय, अशी कविकल्पना आहे. पुष्कळ अंशीं वक्त्याचें श्रमसाफल्य कीर्तीतच असतें. आतां कदाचित् कोणी असें ह्मणतील, कीं त्याला कधींकधीं त्याच्या अंगच्या योग्यतेपेक्षां जास्त मान मिळतो. परंतु त्याचीं कारणें अशीं आहेत कीं, एक-तर अतिशयोक्ती करण्याकडे बहुधा लोकांचा कल विशेष असतो; दुसरें अमुक एक चीज अद्वितीय आहे, सर्वोत्कृष्ट आहे, असें जरी कोणीं ठोकळ शब्दांनीं आपल्याला सांगितलेलें आपण ऐकिलें असलें तरी वाढवून सांगण्याचा सर्वत्र प्रघात असतो. तिसरें असें कीं 'वक्ता दशसहस्रेषु' या उक्तीप्रमाणें कदाचित्च क्वचित् वक्ते आपल्या दृष्टीस पडत असतात, ह्यामुळें आपणांस त्यांचें विशेष महत्व वाटून त्यांच्या अंगीं तितकी योग्यता नसतांही सहजीं त्यांस आपणाकडून बहुमान मिळतो.

ज्या अर्थी अंगीं वक्तृत्वगुण असल्यानें जगांत आपल्याला एक प्रकारचें वजन मिळून चोहोंकडे आपली कीर्ति पसरते, असें आह्मीं वर सांगितलें आहे, त्या अर्थी वक्तृत्वाच्या स्वरूपाचें थोडेसें निरूपण करणें अगदीं इष्ट आहे. ह्मणून तें आह्मी येथें देतों.

वक्तृत्वाविषयीं लोकांच्या इतक्या कांहीं चमत्कारिक व भलत्या समजुती झाल्या आहेत कीं तशा इतर कशा-विषयींही झाल्या नसतील; व याचयोगानें वक्तृत्वाची खरी किंमत पुष्कळांना अद्यापपर्यंत कळली नाहीं. या-करितां वक्तृत्वाचें खरें स्वरूप काय आहे, याची अगोदर माहिती करून घेणें अगदीं अवश्य आहे. एखाद्या साधारण मनुष्याजवळ जर आपण वक्तृत्वाविषयीं गोष्ट काढिली, किंवा त्या गुणाची प्रशंसा करूं लागलों, तर तो आपल्या बोलण्याकडे सहजीं दुर्लक्ष करितो. त्याची समजूत अशी असते कीं वक्तृत्व ह्मणजे एक प्रकारची लोकांस फसवि-ण्याची, व आपलीं मतें निर्बल असतां तीं सबळ करून दाखविण्याची एक विद्या आहे; किंवा श्रोत्यांचें नुसतें मनो-रंजन होईल अशा प्रकारें बोलण्याची एक खुबी आहे. तो ह्मणेल कीं 'आह्मांला फक्त ज्ञान किंवा शहाणपण असलें ह्मणजे पुरें आहे. तुमचें वाक्पांडित्य पोरांनाच राहूं द्या. त्याची आह्मांस मुळींच जरूरी नाहीं.' पण हें त्याचें ह्मणणें चुकीचें आहे. वक्तृत्वाचा वास्तविक अर्थ तो ह्मणतो तसा असता तर त्याचें बोलणें रास्त होतें, व ती कला तिरस्कारार्ह होऊन समजूतदार व शहाणे लोक तिच्या नादीं मुळींच लागतेना. परंतु तो ह्मणतो तसा अर्थ मुळींच नाहीं. खरें वक्तृत्व ह्मणजे प्रसं-गास धरून मुद्देसूद बोलतां येणें हेंच आहे. ह्यापलीकडे कांहीं नाहीं. ज्याकरितां बोलावयाचें तो हेतु जेणेंकरून साध्य होईल अशा प्रकारचें संभाषण करण्याची शैली ही वक्तृत्व शब्दाची उत्तम व्याख्या होय. जेव्हां आपण

कांहीं बोलतों किंवा लिहितों तेव्हां आपल्या मनांत प्रथम कांहीं एक हेतु असतो. मग तो कोणाला कांहीं सांगण्याचा ह्मणा, किंवा त्यास संतोषित करण्याचा ह्मणा, किंवा कशा तरी रीतीनें त्याच्यावर आपलें तेज पडावें ह्मणून ह्मणा; पण कांहींना कांहीं तरी हेतु असतो हें खचित. आपण जें बोलूं किंवा लिहूं तें सर्व वायफळ न होतां आपला हेतु साध्य होण्याच्या कामीं बहुतांशीं उपयोगी पडेल अशा रीतीनें जो बोलतो किंवा लिहितो त्यासच सुंदर वक्ता हें नांव शोभतें. तेव्हां विषय कशाही प्रकारचा असो, इतिहास तत्वज्ञान यांसंबंधाचा असो कीं इतर कोणताही असो, त्यावर वक्तृत्व करितां येत नाहीं, असें कधींच होत नाहीं. वक्तृत्वाचे पुष्कळ निरनिराळे प्रकार आहेत. कधीं उपदेशरूपानें शिकवणीच्या गोष्टी सांगाव्या लागतात; कधीं श्रोत्यांचें मनोरंजन करून त्यांस खुष करून सोडावें लागतें; कधीं त्यांस संभाषणानें आपल्या बाजूकडे ओढून घ्यावयाचें असतें; अशा अनेक प्रसंगीं अनेक तऱ्हेचें वक्तृत्व करावें लागतें. वर जी वक्तृत्वाची व्याख्या दिली, तींत हे सर्व प्रकार येतात.

परंतु व्याख्यानाचा मुख्य हेतु श्रोत्यांमध्यें एका प्रकारची चळवळ सुरू करून त्यांच्याकडून कांहीं कृत्यें घडविण्याचा जेव्हां असतो, व तसें भाषण होऊन श्रोत्यांमध्यें खरोखर जेव्हां तसली चळवळ उत्पन्न होते, तेव्हां मात्र वक्तृत्वशक्तीचें खरें सामर्थ्य कळून येण्याचा जास्त संभव असतो; आणि मुख्यत्वें एवढ्याचकरितां वक्तृत्व कलेंत मोडलें

जाऊन, तें मन वळविण्याची एक कला आहे अशी त्याची व्याख्या होऊं शकते.

आतां यावर कोणी असा आक्षेप घेतात कीं, वक्तृत्वानें चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टी करण्याविषयीं लोकांचें मन वळवितां येतें. होय, येतें खरेंच; यांत कांहीं शंका नाहीं. पण बुद्धिवादाचा देखील जिकडे उपयोग केला तिकडे होणार आहे; आणि लोकांना फसविण्याच्या कामीं बुद्धिवाद विशेष उपयोगी पडतो, असें तर आपण नेहमीं पाहतोंही. असा त्याचा दुरुपयोग होत आहे, ह्मणून तो वाढविण्याचा प्रयत्न करूं नये असें कोण ह्मणेल? बुद्धिवाद आणि वक्तृत्व ह्या दोनच काय, पण मानवी प्राणी शिकत आलेली आजपर्यंतची दुसरी कोणतीही कला घ्या, ती वाईट मनुष्याच्या हातीं गेल्यावर तिचा दुरुपयोग होतोच होतो. ह्मणून अशा क्षुल्लक कारणावरून त्या कला अगदीं त्याज्य आहेत असें प्रतिपादन करणें ह्मणजे निवळ पोरकटपणा नव्हे काय? दुर्गुणादि वाईट गोष्टी आणि खोटीं कामें करण्यांत आपण जितकी बुद्धी खर्च करितों तितकीच जर सद्गुणादि चांगल्या गोष्टी आणि खरे-पणाचीं कृत्यें करण्यांत खर्च केली, तर त्यापासून आपला किती उपयोग होईल बरें? वक्तृत्व हें शाळेंत शिकून या-वयासारखें नाहीं. एकदां मनुष्याला कांहींएका गोष्टीची खरी कळकळ लागली, ह्मणजे तो गुण आपोआप त्याच्या अंगीं येतो. फार कशाला, एखाद्यावर कांहीं आणीबा-णीचा प्रसंग येऊन त्यांत त्याचें मोठेंसें नुकसान होण्याची भीति त्यास वाटूं द्या; ह्मणजे पहा, तो आपल्या हितासाठीं

कसा हरप्रयत्नानें दुसऱ्याचें मन वळविण्याची खटपट करितो ती ! यावरून हें निर्विवाद आहे कीं, सृष्टिनियमानें घालून दिलेला जो धोपट मार्ग आहे, तोच अनुसरण्याला वक्तृत्वकला आपल्याला लावते; यापेक्षां जास्त कांहीं सांगत नाहीं. तेव्हां त्या मार्गाचें अवलंबन आपण बरोबर रीतीनें केलें म्हणजे वक्तृत्वकलेचें आपल्याला पूर्ण अध्ययन झालें असें होईल; आणि मग त्यायोगानें वाईट मनुष्याप्रमाणें आपल्या हातून तिचा दुरुपयोग न होतां, खरी वक्तृत्वशक्ति आणि कोरडें वाक्पांडित्य यांतील भेदाभेद स्पष्टपणें लोकांस दाखवितां येईल.

द्रव्यदानापेक्षां सदुपदेश करणें फार श्रेयस्कर आहे असें साधुवाक्य आहे. या साधूक्तीस अनुसरून हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. समाजापुढें व्याख्यान देण्यासंबंधानें वाचकांस चांगली उपयुक्त माहिती व्हावी, व ती त्यांनीं ग्रहण करून आपला दृढनिश्चय ढळूं न देतां चांगली मेहनत घेऊन वक्तृत्वाचा अभ्यास करावा, आणि उत्तम वक्ते ह्या नांवास पात्र व्हावें, हाच या पुस्तकाचा मुख्य हेतु आहे. पुष्कळ लोक ह्या वक्तृत्वावर वरच्या प्रमाणेंच आणखी एक विलक्षण प्रकारचा आक्षेप घेत असतात. ते असें म्हणतात कीं, विद्वानापेक्षां जे अविद्वान आहेत त्यांच्या भाषणांत जोर जास्त असतोसा दिसतो. मग वक्तृत्वाचा अभ्यास करण्यांतच काय विशेष आहे ! निरर्थक श्रम मात्र व्हावयाचे. त्यापेक्षां स्वाभाविक रीतीनें जें येईल तेंच चांगलें असें म्हणून स्वस्थ बसावें हें फार उत्तम. परंतु अशी समजूत बहुतकरून जे अडाणी आहेत,

ज्यांना म्हणून युक्तीच्या ठिकाणीं शक्तीचा अगदीं अभाव असतो असें वाटतें, त्यांची असते. अर्थात् अशा मंडळीला बहुतकरून दार उघडून आंत जाण्यापेक्षां तें फोडून आंत प्रवेश करणें, तसेंच दोरीला निरगांठ बसली असतां सोईनें ती सोडण्याच्या भरीस न पडतां एकदम दोरी तोडून टाकणें, किंवा जनावरांस हांकून नेण्यापेक्षां त्यांस फरफटत ओढीत नेणें, यांतच जास्त पराक्रम आहे असें वाटत असेल.

हें पुस्तक लिहितांना प्रथम वक्त्याच्या अंगीं स्वाभाविक गुण कोणते असावे ते सांगून, नंतर वक्ता होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यानें अध्ययन करण्यासारख्या गोष्टी, वक्तृत्वाचे निरनिराळे प्रसंग, व्याख्यानपद्धति, विषयाचे निरनिराळे भाग, त्यांची जुळणी, व्याख्यान देण्याच्या निरनिराळ्या रीती, श्रोतृसमाज, वगैरेचें थोडेसें दिग्दर्शन करूं.

वक्तृत्वाचा अभ्यास कठिण तर खराच; पण विद्यार्थ्यानें निराश न होतां सतत त्याच्या पाठीस लागल्यास त्यास वक्तृत्वगुण साधण्यासारखा आहे. मनुष्य काय करूं शकणार नाहीं! मनांत आणील तें करील. त्याच्या मानसिक शक्तीचा असाच कांहीं विलक्षण प्रभाव आहे कीं, त्यानें अमुक एक गोष्ट करावयाची असें मनांत आणिलें पुरे, कीं तें तडीस गेलेंच.

आपण जरी सुप्रसिद्ध वक्ते न झालों, आपल्याला मोठमोठ्या ठिकाणीं जाण्याचा प्रसंग जरी न आला, तरी वक्तृत्वकलेचा अंशतः उपयोग होण्यासारखे पुष्कळ प्रसंग आपल्याला येतील, आणि तेथें आपल्या वक्तृत्व-

गुणाचा कांहीं तरी उपयोग होईल. सर्वच उपदेशक, बारिस्टर किंवा पार्लमेंटचे सभासद होतात, असें नाहीं. कांहीं साधारण वकील असतात; कांहीं एखाद्या कंपनीचे भागीदार असतात; कांहीं किरकोळ सभांचे चिटणीस असतात; कांहीं दुसरा व्यवसाय करितात; परंतु सर्वांना थोडा ना फार वक्तृत्वाचा उपयोग आहेच. तेव्हां त्यांस व ज्यांचा निव्वळ वक्तृत्व करण्याचाच धंदा आहे, त्या सर्वांस हें पुस्तक उपयोगी पडेल अशी आशा आहे.

भाग २ रा.

स्वाभाविक गुण.

न्या बुद्धीच्या मुळाशीं अशी एक नैसर्गिक शक्ति असते, कीं ती शिक्षणादि कोणत्याही साधनांनीं संपादन करूं ह्मटलें तरी संपादितां येत नाहीं. मोठ्या समाजापुढें व्याख्यान देण्याची गोष्ट तर खरोखर अशीच आहे. तेथें भाषण करणाराच्या अंगीं ही शक्ति मूळची असली पाहिजे. चांगला वक्ता होण्याला अंगीं बरेच स्वाभाविक गुण असावे लागतात. त्याखेरीज वक्त्यास, आपण मोठ्या योग्यतेला चढूं ही आशाच करणें नको.

तीव्र सहृदयता.—हा पहिला गुण. हा वक्त्याच्या अंगीं अगदीं जरूर असला पाहिजे. सहृदयता ह्मणजे आपण जें काय पाहतों किंवा ऐकतों त्याचें चटूकन आपल्या मनावर हुबेहुब चित्र वठणें. तें चांगलें वठलें असलें, ह्मणजे मग अर्थात् आपलें इद्गत दुसऱ्याला कळविण्यास फारशी अडचण पडत नसते. तें तेव्हांच व्यक्त करितां येतें. पण येथें हें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं जी गोष्ट पुष्कळांनीं पाहिली आहे किंवा ऐकिली आहे, ती सर्वांच्या मनांत सारखी कधींच वठत नसते. प्रकृतिवैचित्र्यामुळें

एकाला जसें भासेल, तसेंच दुसऱ्याला कदाचित् भासणार नाहीं, हें उघड आहे; आणि ही गोष्ट सर्व कलांना लागू आहे. प्रस्तुत आपण वक्तृत्वाचा विचार करीत आहों. तेव्हां त्या कलेंतदेखील पाहानात कीं, व्याख्यानविषयासंबंधानें जसा ज्याचा ग्रह झाला असेल, तशा पद्धतीनें तो बोलत असतो. एखाद्या वक्त्याची कल्पनाशक्ति इतकी तरतरीत असते, कीं तिच्या योगानें तो आपल्या कल्पना जगापुढें चटकन मांडून, त्यांचा परस्पर संबंध आणि अनुक्रम कसा काय आहे, हें तेव्हांच दाखवून देतो. तसेंच, एखाद्या विषयावरील कोणाचे विचार सारखे जुळतात, कोणाचे विसंगत दिसतात, कोणाची विचारसरणी चांगली, हें ओळखून काढण्याचें त्यास पूर्ण ज्ञान झालें असतें. यामुळें तो ते विचार मोठ्या खुबीनें आणि सौम्यतेनें जगापुढें एकदम मांडूं शकतो. कल्पनेला हव्या तशा भराऱ्या मारूं देणें त्याला आवडत असल्यामुळें, त्या विषयांत काय काय आहे हें त्यास चांगलें माहीत असतें. त्याच्या मनांत हजारों कल्पना जरी आल्या असल्या तरी कांहीं एक घोटाळा न होतां, प्रत्येक कल्पना मनामध्यें नीट रीतीनें आणून व मोठ्या खुबीनें तिची खुलासेवार व्याख्या करून तो लोकांना सांगत असतो. अशा मनुष्याकडून शिक्षकाचें आणि उपदेशकाचें काम चांगलें होईल.

दुसरा बोलणारा असा असतो कीं, त्यास हरएक प्रकारच्या मनोविकाराची चांगली ओळख असते. त्याच्या अंतःकरणांत कठोरपणा, कोंवळेपणा, स्नेहभाव इत्यादिकांचा ठसा चांगला बिंबलेला असतो, त्यामुळें मनुष्याला द्रव येऊन

त्याचें मन वळेल असें करण्याविषयीं तो योग्य उल्हासानें खटपट करितो, व तींत त्यास यशही मिळतें; इतकेंच काय, पण त्याच्या मनांत आलें, तर श्रोत्यांचीं अंगें जेणेंकरून पुलकित होतील, जेणेंकरून त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू निघतील, किंवा भीतीनें त्यांचें काळीज धडधड करूं लागेल, असें देखील तो करूं शकेल. अर्थात् असा मनुष्य वक्ताच बनला पाहिजे, शिक्षक होऊन उपयोगी नाहीं. पण तो बुद्धिवादापेक्षां आपल्या अंगविक्षेपादि चेष्टांनींच खरी कळकळ दाखवून लोकांचीं मनें जास्त आपलींशीं करून घेईल, यांत संशय नाहीं.

कोणी नानातऱ्हेचीं रूपकें आणि उत्प्रेक्षा वगैरे देऊन श्रोत्यांचीं मनें रंजवीत असतो. कारण त्याची स्वतःची अशी स्थिति असते, कीं जी गोष्ट तो पाहतो, किंवा ऐकतो, तिची कल्पना एकदां त्याच्या डोक्यांत चांगली शिरली, ह्मणजे ती पुनःपुनः त्याच्या मनांत घोळत असते. ती अशी घोळूं लागली ह्मणजे त्यास ती चांगली कळली असें होतें, आणि एवढ्याचकरितां तिचें पुनरुच्चारण करण्यांत त्यास मोठा आनंद वाटतो. अशा वक्त्याचें व्याख्यान बहुशः वर्णनात्मक असून त्यांत कविलाघव फार असतें. इतर व्याख्यानकारांप्रमाणें तो श्रोतृजनांच्या अंतःकरणांस उद्देशून न बोलतां त्यांच्या कल्पनातरंगांशींच बोलत असतो. त्याच्या भाषणापासून ह्मणजे समाजाच्या मनाला कांहीं एक विकार किंवा उपदेश होतो, हें मुळींच नाहीं. मनरंजन आणि करमणूक मात्र होते. तें कांहीं गोष्टी मूळ आहेत तशाच सांगून, व कांहींला निरनिराळ्या

उत्प्रेक्षा वगैरे देऊन, आणि बोलतां बोलतां मध्येंच थोडासा अलंकाराचा झोंक आणून आपल्या चटकदार भाषणानें श्रोत्यांस गार करून सोडतो. यावरून सहृदयता चांगली जागृत राहण्यास कल्पना, भावना, आणि रूपकें ह्या तीन साधनांपैकीं कोणतें तरी एक साधन निदान जवळ असलेंच पाहिजे, असें सहज दिसून येईल. ज्याला ह्मणून समयस्फूर्तीनें व्याख्यान द्यावयाचें असेल त्यानें प्रथम प्रतिपाद्य विषयाचें चांगलें मनन करून आपल्या मनावर त्याचा उत्तम प्रकारें ठसा उठवून घ्यावा. ह्मणजे असें होईल कीं त्या विषयाचें चित्र त्याच्या हृत्पटलावर जसें वठलें असेल, तशा प्रकारचे त्याच्या तोंडून शब्द निघून, श्रोत्यांच्या मनावर हुबेहूब तोच ठसा उमटेल

कुशाग्रबुद्धि.—सहृदयतेच्या खालोखालचा स्वाभाविक गुण ह्मटला ह्मणजे कुशाग्रबुद्धि हा होय. प्रतिपाद्य विषयासंबंधानें आपल्याला जें भासत असेल, किंवा त्याविषयीं आपला जो समज झाला असेल, त्याचा कल्पनाशक्तीच्या साह्यानें नीट विचार करून आणि रूपकें योजून वाफेचें किंवा ढगाचें पाणी होऊन तें जसें पर्जन्यरूपानें जमीनीवर पडतें, तसा शब्द आणि वाक्यरूपानें तो आपल्या मुखांतून निघून समाजक्षेत्रावर एकदम पडला पाहिजे. ज्या शक्तीच्या योगानें हें रूपांतर होऊन मनांत आलेल्या गोष्टीविषयीं एक निश्चयात्मक विचार करितां येतो, तिलाच बुद्धि असें ह्मणतात. ही बुद्धि मनुष्याला उपजतांक्षणींच असते खरी, पण ती उत्तरोत्तर जास्त वाढवीत गेल्यानें परिपक्व होते. हें सामर्थ्य मनुष्याच्या अंगीं मूळचें असावें;

परंतु मूळचें असूनही तेवढ्यावर त्यानें स्वस्थ बसतां कामा नये. उत्तरोत्तर तें वाढविण्यासाठीं खटपट केलीच पाहिजे. मनुष्याच्या बुद्धीचा प्रकाश केवळ त्याच्या विचारसरणींतच दृष्टीस पडतो असें नाहीं; तर विषयाचा नकाशा तयार करून तो कायम करण्यांत, आयत्या वेळीं उठून व्याख्यान देण्यांत, आणि भाषण चाललें असतां स्मरणशक्ती जागृत ठेवण्यांत देखील, त्याच्या अंगची बुद्धि दृष्टोत्पत्तीस येते. याकरितां वक्त्याची बुद्धि फार तीव्र असली पाहिजे. विषयाचें मनन करण्याकडे जितकी बुद्धी जास्त खर्च करावी, तितकें त्याविषयीं लोकांची समजूत घालण्यास चांगलें सांपडतें असा साधारण नियम आहे.

तारतम्यज्ञान.—हें वक्त्याला फार उपयोगाचें आहे. याची मूळ व्याख्या ह्मटली ह्मणजे, पदार्थांतील गुणादिक जाणून तदनुरूप उपचारादि करण्याविषयीं जें बुद्धीच्याठायीं कौशल्य असतें तें. तारतम्याचा वक्त्यास पावलोपावलीं उपयोग आहे. संभाषणांत कोणते विचार काढावे, कोणते काढूं नयेत, शब्दांची योजना कशी करावी, कशी करूं नये, कोणते अलंकार किंवा दाखले लोकांस पटतील, कोणते पटणार नाहींत, या सर्व गोष्टी तारतम्यानें त्यास कळून येतात. एवढ्याकरितां सगळें व्याख्यान संपेपर्यंत व्याख्यानकारानें तारतम्य सोडतां कामा नये. तें धरून चाललें पाहिजे, तरच त्याचें भाषण लोकांस गोड लागेल, एरवीं लागणार नाहीं.

उल्हास किंवा खरी कळकळ.—हाही एक गुण खऱ्या वक्त्याचे अंगीं असणें जरूर आहे. सबळ आणि

बळकट पुरावा मांडून कोटिक्रम करीत बसण्यापेक्षां, नुसता उल्हास आणि खरी कळकळ प्रदर्शित केली, तर जास्त कार्यभाग होणार आहे. कारण पुष्कळ प्रसंगीं श्रोत्यांच्या मनोवृत्ती त्यांच्या बुद्धीपेक्षां इतक्या जास्त प्रबळ होतात, कीं त्यांची बुद्धी एक वेळ फिरवितां येईल, परंतु वृत्ती वळविणें वक्त्यास फार कठिण पडणार आहे. एकदां एका बिशपानें एका शोकरसप्रधान नाटकाचा प्रयोग करणाऱ्या इसमास असें विचारिलें कीं, ‘ कां हो, लोकांना नाटकांतील सर्व प्रकार मृगजलवत् खोटे आहेत, व त्यांत आपका कांहीं संबंध नाहीं, असें माहीत असूनही रंगभूमीवर चाललेला प्रकार पाहून त्यांच्या मनोवृत्ती उचंबळूं लागतात, व प्रसंगविशेषीं त्यांच्या नेत्रांतून अश्रुपातदेखील होतो, त्याच लोकांच्यासमोर आम्ही ऐहिक व पारमार्थिक अशा महत्वाच्या विषयांवर जीव तोडून व्याख्यान देत असतां आमचें भाषण अरण्यरुदित होतें, याचें कारण काय असावें बरें ? ’ तेव्हां त्यास त्या नाटककारानें मोठ्या खुबीनें उत्तर दिलें, ‘ महाराज उल्हास आणि खरी कळकळ असल्याखेरीज सर्व व्यर्थ आहे. आपण जें व्याख्यान देतां तें ऐकून आपला खरा प्रकार असतांही लोकांस तो काल्पनिक किंवा खोटासा वाटतो. तेंच आमचें नाटक खरें नसतें, परंतु आमच्या प्रयोगचातुरीनें जगास तें खरें आहे असें त्या वेळीं भासविण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न करीत असतों. ’

यावरून पहा कीं, नाटकांतील पात्रांच्या अंगीं देखील खोट्याचें खरें करून दाखविण्याचें सामर्थ्य असतें, म्हणजे

प्रेक्षकांस तें नाटक उत्तम वाटून त्या पात्रांची मोठी वाहवा होते. याचें कारण असें कीं, नाटकांतील पात्रें प्रेक्षकांना लुब्ध करून सोडण्यास जीं सोंगें घेऊन रंगभूमीवर येतात, त्यांचा प्रथम त्यांच्या मनावर पूर्ण संस्कार झालेला असतो. तीं आपलें पूर्व स्वरूप विसरून नवीन धारण केलेल्या सोंगांत अगदीं निमग्न झालेलीं असतात, यामुळें तीं आपल्या कृतीनें प्रेक्षक जनांस मोहित करून सोडतात. ज्या अर्थी रंगभूमीवर हा गुण इतका उपयोगी पडत आहे, त्या अर्थी तो व्याख्यानस्थानीं जास्त उपयोगी पडेल ह्यांत संशय नाहीं. श्रोत्यांचें अंतःकरण सद्गदित करण्यापूर्वी बोलणाराचें अंतःकरण प्रथम सद्गदित झालेंच पाहिजे, व असें जर न होईल तर त्यानें मग किती जरी बडबड केली, तरी ती व्यर्थ होणार आहे. मनांत कळकळ आणि उल्हास असो अथवा नसो, परंतु आहे असें बाहेरून दाखविल्यानें जर लोक इतके गुंग होऊन जात आहेत, तर खरी कळकळ आणि उल्हास मनांत बाळगून तसें वर्तन ठेवल्यास जगावर आपलें किती बरें वजन पडेल ?

यावरून असें दिसून येईल कीं खरा जो वक्ता असतो तोच खऱ्या कळकळीचा माणूस ह्मणून प्रसिद्धीस येतो; तो कारणाशिवाय कधींही बोलत नाहीं; आणि एकदा बोलण्यास उभा राहिला म्हणजे तन, मन, धन सर्व तेंच असें समजून आपल्या वाग्बलानें लोकांचीं मनें तल्लीन करण्याचा तो प्रयत्न करितो.

तीव्र कल्पनाशक्ति.—वक्त्याची कल्पनाशक्ति मोठी तीव्र असली पाहिजे. समजा कीं, त्याला समयस्फूर्तीनें

एखाद्या विषयावर बोलावयाचें आहे; तर अशा प्रसंगीं कल्पनाशक्ति चांगली असली, ह्मणजे त्याला ज्या विषयावर बोलावयाचें आहे, त्याचा नकाशा अगोदर मनांत कायम करून तो जगापुढें मांडण्याची वेळ येईपर्यंत तो त्यास तसाच जागृत ठेवितां येईल. एखादी फुलाची कळी सूर्यकिरणांनीं प्रफुल्लित होऊन ज्याप्रमाणें चटकन् दृग्गोचर होते, त्याप्रमाणें व्याख्यान चाललें असतां मध्येंच जर एखादा नवीन विचार त्याच्या मनांत आला, तर त्याविषयींचे आपले विचार श्रोत्यांस कसे व्यक्त करून दाखवावे, हें कल्पनाशक्ति तरतरीत असल्यानें त्याचें त्यास एकदम सुचून, लागलींच तो त्याच्या योग्यायोग्यतेचा विचार करितो; आणि विषयाला तो लागू आहे असें वाटल्यास, व्याख्यान चालू असतांच त्यास रंगरूप देऊन समाजापुढें मांडण्यासारखा करून ठेवितो, व वेळ आली ह्मणजे हळूच समाजापुढें सोडून देतो. ह्यावरून स्मरणशक्ति आणि कल्पनाशक्ति तरतरीत असणें किती अगत्याचें आहे हें सहज कळून येईल. भाषणानें ऐकणाराच्या मनावर जो ठसा उत्पन्न व्हावा असें बोलणारास वाटत असतें, त्याचा चित्रपट वक्त्याच्या मनावर स्पष्ट आणि सुबक उमटला पाहिजे; ह्मणजे त्याला आपल्या इच्छेप्रमाणें श्रोत्यांच्या अंतःकरणांत हुबेहूब तसें चित्र वठविण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं.

तामसी वृत्ति.—समाजव्याख्यान प्रशंसनीय होण्याला वक्ता तमोगुणी असला पाहिजे. जे व्याख्यानकार सत्वगुणी किंवा रजोगुणी असतात, ते फारसे प्रख्यातीस येत नाहींत.

कारण जो मनुष्य सात्विक वृत्तीचा आहे त्याचा पित्तप्रकोप कधींच होत नाहीं; तसेंच रजोगुणी मनुष्य फार चंचल असल्यानें त्याच्या हातून नेट धरून धिमेपणानें कोणतेंही काम शेवटास जात नसतें. तमोगुणी मनुष्यांत नुसत्या थोर कल्पनाच असतात असें नाहीं, तर हजारों अडचणी एकीकडे झुगारून देऊन, दृढनिश्चयानें कार्य साधण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असतें.

दृढनिश्चय आणि मनाची स्थिरता.—प्रसिद्ध वक्ता होण्यास वक्त्याचें मन स्थिर असावें लागतें. भित्रेपणा आणि कातरता अंगीं असल्यावर त्यास यशप्राप्ति मुळींच व्हावयाची नाहीं. मूळ आरंभीं समाजापुढें उभें राहण्यासच एक प्रकारचें थोडेंसें धैर्य असावें लागतें. विचार प्रकट करण्यास त्याहून जास्त लागतें. तेव्हां मग विरुद्ध मताचें खंडन करून आपलें मत स्थापित करण्यास वक्त्याच्या अंगीं फारच धैर्य असलें पाहिजे हें अगदीं उघड आहे. आयत्या वेळीं भाषण करणारा मनुष्य तर खरोखर मोठा धीट असला पाहिजे; कारण तशा प्रसंगीं भिऊं भिऊं केलें कीं शब्द सुचत नाहींत, मनांत योजिलेला विषयाचा नकाशा विस्कळीत होऊन जातो, स्मरणशक्ति राहत नाहीं, कल्पनाही चालत नसते; अशी धांदल उडून तो मनुष्य इतका गांगरून जातो, कीं त्याच्या तोंडांतून अस्खलित शब्द निघण्याला मोठी मारामार पडते, आणि अखेर त-त-त प-प-प असें होऊन शेवटीं खालीं बसण्याची पाळी येते. याकरितां बोलूं इच्छिणारानें न कचरतां समयस्फूर्तीनें धीटपणा धरून बोललें पाहिजे. केवळ धीटपणाच धरून

आढळून येतो. उदाहरणार्थ स्त्रिया घ्या, किंवा लहान मुलें घ्या; त्यांच्या नजरेंत किंवा ऐकण्यांत एखादी गोष्ट आली पुरे, कीं ती त्यांच्या मनांत तेव्हांच ठसते. हा गुण त्यांच्यांत विशेष असतो. तशांत त्यांचीं अंतःकरणें आणि गात्रें कोमल व नाजूक असून त्यांचें मनही फार चंचल असतें, यामुळें तीं एखादी गोष्ट किती तरी प्रफुल्लित मनानें सहज बोलून जातात. अशाच मासल्याचा कांहीं गुण समयस्फूर्तीनें भाषण करणाराच्या अंगीं असणें जरूर असतें. जो मनुष्य आपल्याच ठिकाणीं गर्क असतो, जो एखाद्या गोष्टीवर फार वेळ विचार करून तीस प्रत्यंतरें पाहत बसतो, आणि ज्याला आपले विचार योग्य शब्द मिळाल्याशिवाय प्रकट करितां येत नाहींत, किंवा प्रकट करावे असें वाटत नाहीं, अशा मनुष्याला आयत्या वेळीं बोलणें मोठें मुष्कील पडेल. तसेंच जो मनुष्य नेहमीं उदास, तिरसट, आणि एकलकोंडा असतो, व ज्यास मंडळींत मिसळावें असें कधींच वाटत नसतें, जो जात्या दिवाभीतासारखा असतो, त्याला समाजांत कधींच बोलतां यावयाचें नाहीं. चार मंडळींत जाणें येणें, बसणें बोलणें, हें ज्याला आवडत नाहीं त्याला वक्तृत्वकलेचें ज्ञान कधींच व्हावयाचें नाहीं हें अगदीं खास आहे. तें प्राप्त व्हावयास निराळ्याच प्रकारचा मनुष्य लागतो. ज्याचा दिल खुला आहे, जो लोकांवर विश्वासतो व लोकांचें विश्वासस्थान होतो, व ज्याची वृत्ति नेहमीं आनंदित असते, अशालाच तें प्राप्त होईल तर होईल; कारण अशा वृत्तीचा मनुष्य मंडळीचा मोठा भुकेला असतो व त्याला मंडळींत गेल्या-

आल्याशिवाय चैन पडत नसतें; यामुळें त्याच्या अंगीं धीटपणा येऊन त्याचें मन सदोदित प्रसन्न असतें. तीच मनुष्याची वृत्ति साशंक असली ह्मणजे, बोलूं कीं नको, असा संदेह वरचेवर उत्पन्न होऊन, किंवा आपणाला कोण काय ह्मणेल, ह्याचीच भीति वाटून सर्व गोष्टी बाहेर न येतां मनांतल्या मनांत तशाच राहतात. यामुळें मन साफ नसतें व कोणीच बोलायाला नसल्यानें तोंडही अर्थात् बंदच राहतें. समयस्फूर्तीनें बोलणारास वरील गुण फार उपयोगी आहेत असें जरी नुकतेंच सांगितलें, तथापि त्यांच्यायोगानें ह्मणजे सर्व व्यंगें दूर होतील असें नाहीं. त्यायोगानें कधीं कधीं मनुष्याच्या हातून एखाद्या गोष्टीचा पुरतासा चांगला विचार न होतां, त्याच्या भाषणांत बराच कोतेपणा दिसून येईल, कदाचित त्याचा निष्काळजीपणा दिसेल, व त्याच्याकडून कधीं कधीं निरर्गल प्रलाप होतील. परंतु बोलावयास उठण्यापूर्वी नीट रीतीनें विचार करून तितक्यांतल्या तितक्यांत जर तो चांगली तयारी करील, आणि अंमळ जपून बोलेल, तर वरील प्रकार किंवा विषयांतर वगैरे कांहींएक न होतां, उलट त्याच्या भाषणाचा परिणामही चांगला होईल.

उपजत किंवा ईश्वरदत्त वक्तृत्वगुण.—कोणतीही कला घ्या, ती बुद्धीला एक प्रकारचें वळण लावून परिपक्व करणारी असते. परंतु तिच्या अंगीं बुद्धी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य मुळींच नसतें. व्याकरण आणि साहित्यशास्त्र यांच्या साह्यानें मनुष्यास शुद्ध आणि सरस कसें बोलावें हें शिकवितां येईल; परंतु त्याच्यापलीकडे त्यास जातां

येणार नाहीं. अंतःकरणापासून उत्पन्न झालेली व दुसऱ्याच्या अंतःकरणास जाऊन भिनणारी जी वक्तृत्वशक्ति तिचा लाभ त्यास कशानेंच होणार नाहीं. निःसंशय ती एक ईश्वरी देणगीच समजली पाहिजे. हें जें स्वभावजन्य वाक्चातुर्य कित्येक मनुष्यांच्या अंगीं असतें, तें त्यांचा नीतिस्वभाव व इंद्रियसौष्ठव ह्यांचेंच फळ होय. हीं दोन्ही पूर्णतेला येऊन, एकमेळानें राहिल्याखेरीज वक्तृत्वशक्ति पूर्णतेला कधींच येत नाहीं.

इतर कलांप्रमाणेंच वक्तृत्वकलेंत पारंगत होण्यास मनुष्यास अविश्रांत मेहनत केली पाहिजे. ज्याप्रमाणें लोहचुंबकाचा कांटा नेहमीं उत्तर दिशा दाखवीत असतो, त्याप्रमाणें त्यानें इतर प्रेरणांस वश न होतां, नेहमीं वक्तृत्व विषयाकडे धांव घेतली पाहिजे. तरच त्याचे श्रम सफल होतील, व तो उत्तम वक्ता या नांवास लायक होईल. जगांत ज्या नानाविध कला आहेत, त्या सर्वांच्या मुळाशीं सर्वसाधारण असें एक तत्व आहे. तें तत्व ह्मणजे आत्म्याची व मनाची जागृत अवस्था हें होय. ह्या अवस्थेला प्रोत्साहन मिळून ती वृद्धिंगत व प्रकट होण्याची जरूरी असते. प्रत्येक मनुष्याच्या अंगीं कांहींएक विशेष प्रकारचा नैसर्गिक गुण असतो; त्या गुणामुळें, व त्याच्या शारीरिक व मानसिक रचनेंत जे कांहीं विशेष असतात त्यांच्यायोगानें मनुष्याची मानसिक जागृति एक विशिष्ट प्रकारचें रूप धारण करून प्रकट होत असते. जगांत ज्या नाना प्रकारच्या कला व त्यांपासून झालेलीं कार्यें दृष्टीस पडत आहेत, त्यांचें मूळ कारण तरी हेंच आहे.

सद्गुण किंवा भलेपणाः—वक्ता चांगल्या योग्यतेस चढण्यास तो सद्गुणी व थंडा मनुष्य असावा लागतो, हें येथें सांगणें जरूर आहे. प्राचीन साहित्यशास्त्रवेत्तेदेखील असेंच ह्मणत आले आहेत. आतां त्यांनीं सद्गुणाचें स्पष्टीकरण करितांनां कदाचित् थोडीशी अतिशयोक्ती केली असेल, नाहीं ह्मणवत नाहीं; तरी पण, त्यावरून वाईट मनुष्य चांगला वक्ता होत नाहीं, हा सिद्धांत काढण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. एखाद्या चांगल्या गोष्टीचा ठसा आपल्या मनावर उठून, तो दुसऱ्याच्या मनावर उमटविण्यास जी शक्ति, व मनाची प्रसन्नता लागते, ती वाईट मनुष्याच्या अंगीं कधींही वास करीत नाहीं, हें खचित. आपण अपराध केला आहे, मग तो कोणत्याही तऱ्हेचा असो, असें एकदां मनुष्याला वाटूं लागलें, ह्मणजे त्याचा उत्साह आणि हुरूप हीं समूळ नाहींशीं होऊन जातात; व त्याबरोबरच त्यास आपल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप वाटून, तो लागलींच खर्कन् उतरतो. यामुळें त्याच्या मनांत जे मोठमोठे विचार असतात ते तसेच एका बाजूस राहतात. परंतु आपलें आचरण शुद्ध आहे अशी स्वतःची ज्याला खातरी असते, त्याला जो हुरूप असतो, आणि जी मनाची प्रसन्नता असते, ती कांहीं वेगळीच आहे. त्यांच्यायोगानें त्यास कोणत्याही गोष्टीचा अभ्यास करण्यास सुलभ पडतें इतकेंच नाहीं, तर त्या अभ्यासापासून त्याला जें फळ मिळतें, त्याचा उपयोग दुसऱ्यांना त्यास सहज करून देतां येतो. वास्तविक जो

वेळ आपण अभ्यासाकडे घालवावयाचा, तो अगोदर आपण प्रापंचिक व्यवहारांत आणि करमणुकीच्या गोष्टींत फुकट घालवीत आहों, यामुळेंदेखील एकपरी आपलें नुकसान होत आहे, असें म्हटलें असतां चालेल. त्यांत जर आपण आपला आणखी कांहीं वेळ विषयसुखांत व हेवामत्सरादि गोष्टींत घालविला, तर मग तें केवढें नुकसान ह्मणावयाचें? दुष्ट अंतःकरणासारखी उतावीळ, विक्षोभी, आत्मघातक, आणि निरनिराळ्या मनोविकारांच्या जाळ्यांत सांपडणारी अशी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. मनुष्याचें मन भ्रमिष्ट होऊन एकदां बिवडल्यावर मग त्यास कसली विद्या आणि कसली कला? तो मग आपला निव्वळ गोटा राहणार. उघडच आहे, शेतामध्यें तन वाढल्यावर तेथें पीक येण्याची कोणी आशा तरी करील काय? एकदां मनुष्याच्या वाईट गुणांची प्रख्याति झाली, ह्मणजे त्याचें कोणी ऐकत नसतें; तो किती जरी चांगलें बोलला तरी ऐकणारावर त्याचें तेज बिलकुल पडत नाहीं. कारण त्याचीं नीच कृत्यें लोकांस चांगलीं माहीत असल्यानें मुळीं त्याचें भाषणच ऐकावेंसें कोणास वाटत नसतें; मग तें पसंत पडण्याची गोष्ट तर लांबच राहिली. त्याचीं मतें खरोखरी जरी ग्राह्य असलीं, तरी तीं त्याज्य अशींच वाटणार. तेंच एखाद्याची सद्गुणाविषयीं चांगली प्रख्याति झाली असली, ह्मणजे मग तो कांहीं ह्मणो, त्याकडे आपलें साहजिक मन वळतेंच. एवढ्याकरितां वक्ता सद्गुणी आणि भला असा असला पाहिजे, इतकेंच नव्हे, तर तशी त्याची

प्रसिद्धिही पण झाली पाहिजे, ह्मणजे त्याचें तेज जगावर सहज पडेल.

क्विंटिलियन नांवाच्या एका पाश्चिमात्य प्राचीन ग्रंथकारानें वक्तृत्वविषयावर आपलीं कांहीं मतें प्रकट केलीं आहेत, त्यांवरून वकील लोकांच्या नैतिक वर्तनाविषयीं जुन्या लोकांच्या कशा काय समजुती असत, हें चांगलें कळण्यासारखें आहे. याकरितां तीं मतें आम्ही खालीं देतों:— वक्ता अत्यंत नीतिमान असून त्याच्या भाषणांत गैरशिस्त किंवा नीतिविरुद्ध कांहीं एक नसलें पाहिजे, असें तो ह्मणतो; तथापि आपण वकील होतों, आणि वकिलाला स्वपक्षाच्या पुष्टीकरणार्थ खऱ्या अगर खोट्या पाहिजेत तशा युक्ती लढवाव्या लागतात; तेव्हां तसें करणें रास्त असतें, असें वकिलास वाटत असतें, हें तो ग्रंथकार विसरला नाहीं. सिसेरोप्रमाणें त्यालाही असेंच वाटत होतें कीं, एखाद्या चांगल्या वक्त्यानें किंवा सद्गृहस्थानें चांगला हेतू मनांत धरून तत्प्रीत्यर्थ जरी एखादे वेळीं असत्य भाषण केलें, किंवा अजाण मनुष्यास त्याच्या हिताकरितां जरी चकविलें, आणि न्यायाधीशाचें मन खऱ्या गोष्टीपासून जरी दूर वळविलें, तरी तें दोषार्ह नव्हे. तसेंच सद्गुणाची अभिवृद्धि व्हावी ह्मणून दुर्गुणाचें जरी कधींकधीं अभिनंदन करावें लागलें, तरी कांहीं हरकत नाहीं, असें त्यास वाटत असे. त्याहीपेक्षां विशेष आश्चर्य करण्यासारखा एक नीतीविरुद्ध मोठा गुन्हा करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं असें तो ह्मणे; तो असा कीं, अमुक एक गोष्ट खोटी आहे

असें माहीत असून, ती तशी नाहीं असें सांगण्यास खुशाल साक्षीदार मथवावे. यावरून, खरोखर वाईट गोष्ट करून जर आपलें हित होत आहे असें वकिलास वाटत असेल, तर त्यानें ती खुशाल करावी, अशी किंटिलियनची समजूत असावी असें वाटतें.



भाग ३ रा.

अभ्यास.

मनुष्याच्या अंगीं जाडा वक्ता होण्याला कोणते स्वाभाविक गुण असावे याचा येथवर विचार झाला. आतां आपण त्यांच्या अभ्यासाकडे वळूं. कार्यसिद्धि होण्यास नुसता स्वाभाविक गुण हा पुरेसा होतो असें नाहीं. फार झालें तर कीर्तिध्वज उभारण्यास तो एक प्रकारचा पाया होईल. तेव्हां वक्ते होऊं इच्छिणारांनीं कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावें हें खालीं दाखविलें आहे. तिकडे त्यांनीं लक्ष पुरवून, झटून उद्योग करण्याचें मनांत आणिल्यास त्यांस हटकून यश येईल अशी उमेद आहे.

ज्ञानप्राप्ति.—प्रथमतः त्यांनीं आपल्याजवळ ज्ञानाचा सांठा पुष्कळ करून ठेविला पाहिजे. ज्ञानाचें महत्व त्यांस पूर्णपणें कळून आलें पाहिजे. अध्ययनार्जित शहाणपणाखेरीज अंगीं स्वाभाविक गुण जरी पुष्कळ असले, तरी ते व्यर्थ आहेत. मग त्या गुणांची वास्तविक कांहींच किंमत नसते. वक्तृत्वगुण अंगीं येण्यास, त्यास पोषक असे कांहीं गुण आहेत त्यांची जरूरी असते, व त्यास चेतना आणण्यास एक प्रकारचें मानसिक प्रोत्साहन लागतें. तें मिळालें ह्मणजे

मग तो गुण प्रज्वलित होऊन नंतर त्याचें तेज दृष्टोत्पत्तीस येतें, असें एका प्रसिद्ध ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. तेव्हां सांगावयाचें ह्मणून एवढेंच, कीं वक्तृत्वास पोषक द्रव्याची फार अवश्यकता असते, हें वाचकांनीं चांगलें ध्यानांत ठेवावें. मूळ महत्वाची गोष्ट तीच आहे. तसेंच वक्त्याजवळ कल्पनांची सामग्रीही बरीच भरपूर असली पाहिजे. नाहीं-तर असें होतें, कीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं त्याची मोठी फजीती उडते. ज्या भाषणांत नुसत्या शब्दलालित्याची मात्र रेलचेल असते, परंतु कल्पना किंवा विचार यांचा मुळींच कांहीं पत्ता नसतो, तें भाषण श्रोत्यांस अगदीं कंटाळवाणें होतें. त्यांस त्यांत कांहींच गोडी लागत नाहीं. दुसरें, एखाद्या वेळेस वक्त्याला कशा प्रकारच्या विषयावर बोलावें लागेल याचा नेम नसतो; यास्तव त्यास सर्व विषय अवगत असावे लागतात. सिसेरोचादेखील असाच अभिप्राय झालेला होता असें वाटतें. सॉक्रेटीस त्याच्याही पूर्वीं होऊन गेला, त्यानेंही असेंच ह्मटलें आहे; तो ह्मणतो कीं ज्या विषयासंबंधानें मनुष्याला पूर्ण माहिती नसते, त्यावर त्यास कधींच चांगलें बोलतां येणार नाहीं. परंतु टली नांवाच्या एका विद्वानानें, मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा आणि ज्ञानाचा विस्तार मनांत आणून, असें प्रति-पादन केलें आहे कीं, ज्ञानाच्या जेवढ्या ह्मणून अवश्य शाखा आहेत, तेवढ्या संपादन करण्याचा वक्ता होऊं इच्छिणारानें प्रयत्न केला ह्मणजे पुरे आहे. यावरून एकं-दरीनें पाहूं गेलें असतां असें सिद्ध होतें, कीं वक्त्यांस

ज्या विषयावर बोलावयाचें असतें, त्या विषयाचें त्यांस ज्ञान चांगलें असलें ह्मणजे बस आहे.

यावर कदाचित् कोणी असा आक्षेप घेतील, कीं एका विषयामध्यें पोटविषय बरेच असतात. त्या सर्वांची त्यास माहिती कोठें असते? त्यांवर त्यास बोलण्याचा प्रसंग येतो, तेव्हां त्यानें कशावर बोलावें? अर्थात् तो जें शिकला असेल त्यावर. सर्व शास्त्रांचें व कलांचेंही असेंच आहे. ज्यावर त्यास बोलावयाचें असेल, तेवढ्यापुरती तो प्रथम तयारी करील, आणि नंतर त्यावर बोलेल.

आतां कोणी असें ह्मणतील कीं, असें जर आहे, तर मग एखादा गवंडी किंवा वाद्यविद्यानिपुण मनुष्य आपआपल्या विद्येसंबंधानें वक्त्यापेक्षां उत्तम भाषण कां नाहीं करूं शकणार? खचितच करूं शकेल. जर वक्त्याला त्या विषयासंबंधानें कांहीं माहितीच नसेल, तर त्याच्यापेक्षां तत्तत्कलाभिज्ञ मनुष्य अधिक चांगलें बोलेल, असें कोण न ह्मणेल? समजा कीं, एखाद्या कोर्टापुढें कांहीं खटला चालला आहे. त्या खटल्यांत मूळ भांडण कशाबद्दल आहे हें जर वक्त्याला समजलें नाहीं, तर तेथें तो काय बोलणार? त्याच्यापेक्षां ज्या मनुष्यासंबंधाचा तो खटला आहे, त्या मनुष्यास लिहितांवाचतां येत नसलें तरी तो उत्तम प्रकारें बोलेल, हें उघड आहे. परंतु एकदां कुळाकडून किंवा वाद्यविद्याकुशल मनुष्याकडून त्या वक्त्यास चांगली माहिती मिळाली, ह्मणजे मग तो त्याच्याहीपेक्षां अधिक कुशलतेनें विषय प्रतिपादन करील यांत शंकाच नाहीं.

उदार शिक्षणांत जेवढे ह्मणून विषय मोडण्यासारखे आहेत, त्या सर्वांची वक्त्यास साधारणतः माहिती असली पाहिजे. त्यांतदेखील एकापेक्षां एक विशेष महत्वाचे विषय आहेत. तेव्हां तिकडे वाचकांनीं आपलें लक्ष अवश्य पोंचविलें पाहिजे. परंतु प्रथम त्यास विशेष सुचवावयाचें ह्मणून एवढेंच, कीं त्यांनीं आपल्याला जें शिकावयाचें तें नीट समजून घेऊन, मनांत पूर्णपणें बिंबेल अशा रीतीनें शिकावें, वरवर शिकूं नये. तसेंच आपल्या मनांतल्या कल्पना, आपले विचार, आणि आपणास समजलेलीं तत्वें, हीं नीट जुळून त्यांची अशा रीतीनें सांखळी लावून ठेवावी, कीं निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करीत असतां, व त्यांवर विचार करीत असतां, ज्या गोष्टी आपल्यास खऱ्या ह्मणून भासतील, त्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा संस्कार आपल्या मनावर होऊं नये. तरुणपणीं जेवढी विद्या संपादन करावी, तेवढी पुढें फार कामास येत असते; कारण त्या वयांत शिकलेल्या गोष्टी जशा मनावर चांगल्या ठसतात, तशा उत्तर वयांत शिकून ठसत नाहींत, असा नियम आहे. तथापि ज्यांना लहानपणीं विद्या शिकण्यास सांपडलें नाहीं, त्यांनीं पुढेंही अभ्यास केला असतां होणार आहे. लहानपणीं आपण विद्या केली नाहीं, ती आतां आपल्याला कसची येणार, अशा समजुतीनें त्यांनीं निराश होऊन बसूं नये.

विद्याभ्यासाचे श्रम फार आहेत असें वाटून, जो कोणी त्यांचा कंटाळा करील, तो कधींही उदयास यावयाचा नाहीं. पण विद्येच्या योगानें जगांत मोठेपणा

मिळतो, ही आशा लागून जर तो मेहेनतीनें झटून अभ्यास करील, तर निःसंशय त्यास वैभव प्राप्त होईल; व त्यायोगानें त्याच्या अध्ययनश्रमाचा पूर्ण परिहार होऊन, त्या वैभवापुढें खरोखर आपल्यास झालेले श्रम कांहींच नाहींत, असें त्यास अनुभवाअंतीं कळून येईल.

उद्योग.—कोणत्याही गोष्टीमध्यें सतत परिश्रम केल्याशिवाय श्रेष्ठता मिळत नाहीं. आपण आयास न करितां एकदम प्रसिद्ध वकील, धर्मोपदेशक, किंवा वक्ते होऊं, असें कोणीं समजूं नये. त्या त्या गोष्टीचा अभ्यासच केला पाहिजे. तोही कांहीं वर्षें करून तसाच अर्धवट सोडून देतां कामा नये. कारण तशानें पूर्ण ज्ञान व्हावयाचें नाहीं, आणि तें न झाल्यानें अर्थात् जगांत आपलें नांव होईल ही आशाच करणें नको. सारांश काय कीं सतत उद्योग करण्याची आपल्याला संवय झाली पाहिजे. जेव्हां जेव्हां उद्योग करण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां अंगांतला आळस झाडून, तो करण्यास आपण नेहमीं तत्पर असलें पाहिजे. उद्योगानें कार्यसिद्धि होऊन मनुष्य श्रेष्ठता पावतो असा एक सृष्टिनियमच आहे. परंतु या नियमास अपवाद आणणारी बुद्धि आपल्या अंगीं आहे, व तिच्या जोरावर आपण उद्योगाशिवाय यशस्वी होऊं असें ज्यास वाटत असेल, तो खरोखर आत्मश्लाघी ह्मटला पाहिजे. वरील सृष्टिनियमांत विधात्याचें किती बुद्धिकौशल्य दिसून येत आहे पहा. खाद्य पदार्थांत मसाला घातला ह्मणजे त्यास रुचि येऊन तो जसा जास्त हवासा वाटतो, तसा उद्योग हा मानवी सुखास खरोखर एक व्यंजन आहे.

तो मनुष्याच्या पाठीमागें लाविलेला आहे, ह्मणूनच बरें आहे. तो जर नसता, तर मनुष्यास आपलें जीवित नकोसें होऊन, त्याचे हातपाय तेव्हांच मोडून गेले असते. आळस आणि विलासीपणा यांपासून शरीराला आणि मनाला जी एक प्रकारची शिथिलता येते, ती आयुष्यांतील खरें सुख भोगण्यास आणि लोकप्रिय गुण संपादन करण्यास नेहमीं वैऱ्याप्रमाणें आपल्या आड येत असते. अंगांत आळस शिरल्यानें अंगांतली तरतरी, हुरूप आणि उत्साहबुद्धि हीं तीन्हीही जागृत राहत नाहींत. याकरितां अंगांत आळस मुळींच शिरूं देऊं नये. तो न शिरण्याला आपण नेहमीं कोणत्या ना कोणत्या तरी उद्योगांत असलें पाहिजे. ह्मणून विद्यार्थी जनहो, आळस झाडा, व विद्याभ्यास करा, मग तो केवळ ज्ञानप्राप्तीकरितां करा, किंवा दुसऱ्या कोणत्याही हेतूनें करा, पण अभ्यास करा. प्रथम कसलाही हेतू मनांत धरून तुम्ही अभ्यासास लागलां, तरी हरकत नाहीं; कारण अभ्यासाची एकदां तुह्मांला गोडी लागली ह्मणजे मग तुह्मी ज्ञान संपादण्यासाठीं तोच पुढें चालवाल.

मनुष्य पूर्ण वक्ता होण्यास सृष्टिनियम मुळींच आड येत नाहीं. तेव्हां जी गोष्ट होणें शक्य आहे, ती आपल्या हातून होणार नाहीं असें ह्मणून व्यर्थ निराश होऊन बसूं नका; हरएक गोष्टीचें पूर्ण ज्ञान होण्याचा प्रयत्न करा. बऱ्याच गोष्टींत पूर्णत्व येत नसतें हें खरें. तथापि कित्येक लोक एखादी गोष्ट असाध्य ह्मणून आळसानें आणि निराशेनें तिजविषयीं मुळींच यत्न करीत नाहींत. तसें न करितां जर तुह्मी तिचा पिच्छा न सोडतां सतत पाठलाग

कराल, तर तुम्ही पूर्णतेच्या जवळजवळ तरी निदान जाऊन पोहोंचाल. आहे त्यापेक्षां आपली स्थिति जास्त चांगली असावी, अशी जर तुमची मनीषा असेल, तर तुह्मी आहां त्या स्थितींत समाधान मानून स्वस्थ बसूं नका. कारण तसें समाधान मानलें, तर शेवटपर्यंत तुह्मांस ती स्थिती धरून राहावें लागेल. आपलें आहे हें बस आहे, असें ह्मणाल, तर फसाल. नेहमीं आपल्यांत जास्त भर पाडण्याची इच्छा धरून, एकेक पाऊल पुढें टाकीत चला. एकाच ठिकाणीं स्थिर राहूं नका. मागें पाऊल आणूं नका, कीं रस्ता सोडूं नका. तो धरून दिवसानुदिवस पुढें पाऊल टाकण्याला पहा. मन हें खडकाळ जमीनीसारखें आहे. त्या जमीनींत खत वगैरे घालून तिची चांगली मशागत न केली, तर ती निःसत्व होऊन पीक मुळींच येणार नाहीं; किंवा आलेंच तर एक येईल. ह्या गोष्टी तुह्मी पूर्णपणें मनांत बाळगा. कारण ह्या तुमच्या अभ्यासक्रमांत, तसेंच संकटसमयीं आनंद देण्यास आणि साहाय्य करण्यास उद्योग फार उपयोगाचा आहे. आतां इतक्या गोष्टी शिकण्यास वेळ फार थोडा, अशी नेहमीं लोकांची कुरकुर असते. परंतु वास्तविक ह्मटलें तर वेळ पुरत नाहीं हा दोष कोणाचा? आपलाच; कारण आपण आपला पुष्कळ वेळ व्यर्थ घालवितों, ह्मणून तो पुरत नाहीं. निव्वळ अभ्यासाकडे आपला किती वेळ जात असेल हें नीट लक्षांत आणा, ह्मणजे वरील ह्मणण्याची सत्यता तुह्मांला कळेल. आपला बहुतेक काळ एकमेकांकडे व्यर्थ जाण्यायेण्यांत, त्यांच्याशीं चकाट्या पिटीत बसण्यांत, तसेंच नाच, तमाशे

वगैरे ख्यालीखुशालीच्या किंवा करमणुकीच्या गोष्टी पाहण्यांत जात असतो. अशा किरकोळ गोष्टींमध्यें जो आपला काळ व्यर्थ जात आहे, तो जर आपण अभ्यासांत घालविला, तर आपलें आयुष्य आपल्याला पुरें होणार आहे. तरी यांत रात्रीचा वेळ मुळींच धरला नाहीं. त्याचा जर विचार केला, तर काय जे पांचसहा तास झोपेंत जात असतील, ते वजा करून बाकी राहिलेला वेळदेखील उपयोगांत आणितां येईल.

ज्याला ज्या धंद्यांत पडावयाचें, त्यानें त्या धंद्याचें ज्ञान अगोदर करून घेण्याकडे आपलें विशेष लक्ष पोंचविलेंच पाहिजे. ज्यास वकील व्हावयाचें आहे, त्यानें कायद्याची आणि ज्या कलांच्या साह्यानें न्यायाधीशाच्या आणि पंचांच्या मनाची खात्री करून देतां येईल, अशा कलांची पूर्ण माहिती करून घेतली पाहिजे. धर्मोपदेशक होऊं इच्छिणारानें आपलें सर्व लक्ष ईश्वरसंबंधी ज्ञान, धर्म, नीति आणि मानवी स्वभाव यांची ओळख करून घेण्यांत घातलें पाहिजे. ज्याला कायदेकौन्सिलांत आपला प्रवेश व्हावा असें वाटत असेल, त्यानें तेथील कामाकाजाची व्यवस्था, त्याचप्रमाणें आपल्या देशाचा प्राचीन इतिहास, लोकांची सद्यःस्थिति, आपल्या देशांत चालू असणारे कायदे, व त्याचा परराष्ट्रांशीं असणारा संबंध, इत्यादि गोष्टींचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. इतर धंद्यांचेंही असेंच आहे. प्रत्येकास आपआपल्या धंद्याकडे विशेष लक्ष पुरवावयाचें असतें; तथापि सर्वांस साधारण रीतीनें सारख्या लागू पडणाऱ्या अशा, कांहीं ज्ञानाच्या शाखा आहेत, व त्या वक्ता होऊं इच्छिणाऱ्या

प्रत्येकानें प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्या येणेंप्रमाणें:—

जगाचें ज्ञान.—वक्ता होऊं इच्छिणारानें प्रथम जगाचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. मनुष्यप्राण्याविषयीं सूक्ष्म रीतीनें विचार करून, त्याच्या अंतर्बाह्य स्वरूपांची त्यास चांगली ओळख झालेली असावी. ज्या लोकांस उपदेश करून त्यांचें मन आपल्यास वळवावयाचें आहे, त्यांच्या माहितीच्या गोष्टींची आणि रीतीभातींची त्याला पूर्ण माहिती असली पाहिजे. मनुष्याचा स्वभाव कसा असतो, त्याचे हेतु काय असतात, त्याचें हिताहित कशांत असतें, तसेंच त्याचा स्वभाव, त्याचें मन, त्याचें शरीर, आणि त्याला खरें सुख मिळण्याचा मार्ग, इत्यादिकांचें ज्ञान त्यानें करून घ्यावें. मनुष्यांचे मनोविकार, त्या विकारांत होणारी चलबिचल, त्यांचें. दमन करण्याचे उपाय, त्याचप्रमाणें त्यांच्या मनोविकारांस स्फूर्ती देऊन ते सन्मार्गाकडे लावणें, एकंदरींत जेणेंकरून त्यांस सुख आणि शांती मिळवून देऊन स्वतःस लोकप्रिय होतां येईल असे मार्ग वक्ता होऊं इच्छिणारास माहीत असले पाहिजेत. जगाचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासंबंधानें शिलर नांवाच्या विद्वानानें ह्मटलें आहे 'मनुष्यानें दुसऱ्यावरून आपल्यास व आपल्यावरून दुसऱ्यास ओळखण्यास शिकावें.' वक्त्यास जगांत चालणाऱ्या व्यवहाराचें नेहमीं काम पडतें, तेव्हां त्यानें त्याचें नीट परीक्षण करून त्याविषयीं वाटाघाट करीत जावें, व नंतर त्यासंबंधाचे आपले विचार व्याख्यानद्वारा त्यानें प्रगट करावे असें सिसेरोचें मत आहे.

भाषाज्ञान.——साधारणपणें वक्त्यास भाषाज्ञान चांगलें असावें लागतें. आपल्या भाषेमध्यें जे ग्रंथ. शुद्ध, सुरस आणि जोरदार अशा भाषेंत लिहिले असतील, ते त्यानें नेहमीं वाचावे. त्यांतील चांगले चांगले वेंचे व विशेषतः सुरस कवनें काढून तीं मुखोद्गत करावीं, व तीं फावल्या वेळीं तोंडानें म्हणत जावें. अशा संवयीनें त्यास करमणूकची करमणूक, आणि उपयोगचा उपयोग असे दोन्ही होतील. यायोगानें त्यास नानातऱ्हेचे विचार सुचतील, भाषामाधुर्य चांगलें कळेल, जगमान्य अशा ग्रंथकारांच्या बुद्धिमत्तेची ओळख होईल, वगैरे अनेक फायदे त्यास होतील. वक्ता होऊं इच्छिणारानें काव्याचें विशेष अध्ययन करावें, असें सिसेरोचें आग्रहाचें म्हणणें आहे. कारण काय, तर कविता आणि वक्तृत्वशक्ति यांच्या स्वरूपसाम्यामुळें त्यांचा परस्पराशीं फार निकट संबंध आहे. तसेंच थिओफ्रॅस्टस याचें असें म्हणणें आहे,कीं वक्त्यास काव्याच्या वाचनापासून फार उपयोग आहे. हें मत पुष्कळांना ग्राह्य आहे, व तें सयुक्तिक दिसतें खरें. काव्यें वाचल्यानें एखाद्या गोष्टीचें निरूपण करतांनां एक प्रकारचा आवेश उत्पन्न होऊन, वर्णनही उत्तम प्रकारें करितां येतें, श्रोत्यांच्या मनोवृत्तीचें हवेंतसें उद्दीपन करितां येतें, रूपकें खुबीनें योजतां येतात, व त्याहीपेक्षां जास्त फायदा आहे, तो हा कीं निरनिराळ्या विषयांच्या मननानें वक्त्याचें मन व्यग्र होऊन, डोक्यास फार त्रास झालेला असतो, तो अशा कविकृतींच्या वाचनानें कमी होऊन त्यास एक प्रकारचा आनंद आणि सौख्य होतें. तेव्हां मनाला जें विश्रांतिसुख द्यावयाचें, तें

काव्यें वाचून देत जावें. सिसेरोचाही असाच अभिप्राय आहे. परंतु प्रत्येक बाबतींत कवींचें अनुकरण करणें चांगलें नाहीं, हें मात्र विसरूं नये. उदाहरणार्थ, भाषास्वातंत्र्य किंवा अलंकारांचा अबाधित उपयोग. 'निरंकुशाः कवयः' या संस्कृत ह्मणीप्रमाणें कवीला जशा प्रकारची मुभा असते, तशी वक्त्यानें आपल्याला घेऊं नये. काव्यधाटी ही शोभेकरितां असते. काव्यांचा मुख्य हेतु, तीं वाचून आल्हाद आणि आनंद व्हावा, हाच काय तो असतो. यामुळें त्यांत निव्वळ कविकल्पना आणि कधींकधीं तर पुष्कळ अविश्वसनीय गोष्टी दिसून येतात.

न्यायशास्त्र. किंवा **तर्कशास्त्र**.—वक्त्यास लागणाऱ्या गोष्टींपैकीं न्यायशास्त्र हें एक साहित्य आहे. हें त्यास अवगत असलें पाहिजे. कारण वादविवाद करण्यास हें फार उपयोगी पडतें. कित्येकांना अंगची तर्कबुद्धि असते, परंतु ती उत्तरोत्तर जास्त वाढविण्याचा प्रयत्न केला असतां पुष्कळ उपयोग होतो. निदान ज्या विषयासंबंधानें आपण हल्लीं विचार करीत आहों, त्या वक्तृत्वविषयास तर तर्कशास्त्राचा अभ्यास केला तितका हवाच आहे. वक्तृत्वांत न्यायतत्वांचा फार उपयोग पडतो, याकरितां तीं वक्त्यास चांगलीं कळून, योग्य ठिकाणीं त्यांचा उपयोग करण्याचें चातुर्य त्याच्या अंगीं आलें पाहिजे. कसाही भ्रांतिमूलक सिद्धांत असो, त्याची व्याख्या त्यास चांगली करतां येऊन, त्यावर सयुक्तिक वाद करतां आला पाहिजे, व तो सिद्धांत सोडवितां आला पाहिजे. एखाद्या चांगल्या अनुभविक गुरूजवळ कांहीं काळपर्यंत न्यायशास्त्राचें त्यानें अध्ययन

केल्याशिवाय त्यांत प्रावीण्य मिळावयाचें नाहीं. तत्वें नुसतीं शिकूनही उपयोग नाहीं. त्यांचा कोठें व कसा उपयोग करावयाचा, हें मुख्य ठाऊक करून घेतलें पाहिजे. एखादा मनोरंजक किंवा बोधपर विषय घेऊन, त्यासंबंधाच्या आपल्या कल्पना असतील त्या प्रथम निराळ्या काढून नंतर त्या नीट सयुक्तिक रीतीनें जुळविण्याची त्यानें आपल्याला संवय लावावी. अशी संवय लावावयाची ती लिहून किंवा बोलून लावावी.

अशी संवय लावण्याला, चांगले विषय ह्मटले ह्मणजे भाषाज्ञान नीति आणि इतिहास हे होत. ह्यांपैकीं कोणताही एक घेऊन, त्याचे प्रथम वेगवेगळाले भाग होण्यासारखे असतील तर ते करून, नंतर त्यांची सिद्धता करण्याचीं साधनें शोधून काढावीं; व त्यांस पूर्णत्व आणण्याचे मार्ग कोणते आहेत ते पाहावे. अशा रीतीनें विषयाची नीट जुळणी करून जेणेंकरून तो सुव्यवस्थित रीतीनें प्रतिपादन केला जाईल, असें करण्याची नेहमीं संवय ठेवावी. कधींकधीं एखादा विषय घेऊन त्यावर दोघांनीं पूर्वपक्ष उत्तरपक्ष करावा, व आपल्यापेक्षां वयानें व विद्येनें श्रेष्ठ असा तिऱ्हाईत इसम पाहून त्याच्याकडून त्याचा निर्णय करवावा. या त्रयस्थानें, ते उभयतां विषयासंबंधानें वादविवाद करावयाला लागले, ह्मणजे त्यांचा एक एक विचार न्यायशास्त्ररीत्या, व्यापक-नियम-साधित-व्याप्यानुमानें किंवा त्र्यवयवाचीं अनुमानें लावून सिद्ध केला जातो कीं नाहीं, हें पाहावें, व तसा सिद्ध केला जात

नसेल, तर तो विचार वरील अनुमानें लावून सिद्ध केल्या-शिवाय, त्या उभयतांस पुढें वादविवाद करूं देऊं नये.

अनुमान काढावयाचें ते असें.—

१. सर्व केळीं खाण्यायोग्य असतात....व्यापक सिद्धांत.

२. हें फळ केळें आहे ....व्याप्य.

३. अतएव हें फळ खाण्यायोग्य आहे....अनुमान.

अशा रीतीनें प्रत्येक विचार स्थापित झाला पाहिजे. आतां ह्या पद्धतीनें विषय कंटाळवाणा होऊन अंमळ त्रासदायक होईल खरा; परंतु पद्धतशीर संवाद चालल्यानें विषयाचें विशेष स्पष्टीकरण होऊन त्याविषयीं मनाची खात्रीही तेंव्हांच होते. दुसऱ्या वेळीं असें करावें कीं, अगोदर विषय न नेमतां, आयत्या वेळीं ज्यावर बोलतां येईल, असा एक विषय घ्यावा, आणि त्यावर बोलावयाला लागावें. अशा वेळीं प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप अगोदर कळत नसतें, यामुळें वाद चालू झाला असतां, त्यामध्यें खरी विद्वत्ता कोणाची व कोणास चटकन विचार सुचून ते स्पष्टपणें सिद्ध करून देतां येतात, हें सहज कळून येण्यासारखें असतें. ह्या वादामध्यें खंडन व मंडन, किंवा विधान व निषेध चालले पाहिजेत. कारण प्रत्येक विषयास प्रतिकूल अनुकूल अशा गोष्टी असतात; तेव्हां प्रत्येक गोष्टीचा ढोबळ विचार करून उपयोग नसतो. तिचीं निरनिराळीं अंगें शोधून त्यांचा सूक्ष्म रीतीनें विचार झाला पाहिजे असतो, तो करण्यास शिकलें पाहिजे. परंतु प्रथम हें सांगितलें पाहिजे, कीं कोणत्याही गोष्टीचा विचार करतांनां, तिच्यासंबंधाचा आपला

जो पूर्वीचा ग्रह असेल, तो धरून बसूं नये. तो अगोदर मनांतून समूळ घालवावा,आणि नंतर त्या गोष्टीचा विचार करण्यास लागावें. आतां ह्या मानसिक कसरतीला मार्गदर्शक कोणी तरी चांगला बुद्धिवान् गुरु मिळाला पाहिजे. मात्र हा गुरु अंधपरंपरेनें चालत आलेल्या गोष्टींचा कांहींएक विचार न करतां त्या खऱ्याच आहेत असें धरून चालणारा नसावा; त्यांवर पुष्कळ विचार करून नंतर त्या खऱ्या अगर खोट्या, जसें त्याच्या निदर्शनास येईल तसें, मानणारा असावा. अशा रीतीच्या वादविवादामध्यें खरे विचार तेव्हांच बाहेर पडत असतात. परंतु ह्या वादविवादांत वक्त्यानें आपला जो मुख्य हेतु, स्वतंत्र रीतीनें आपली तर्कशक्ति वाढविण्याचा, तो विसरतां कामा नये. त्यांत त्यानें आपला कांहीं तर्क चालविला पाहिजे; दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये. कारण केवळ वादविवादपद्धतीनें सत्यशोध करण्याकडे जर त्याचें चित्त लागलें, तर त्यायोगानें त्याच्या जागृत बुद्धीचा ऱ्हास होऊन जाईल. तो हीच पद्धत धरून बसेल, तर त्याची तर्कशक्ति वाढावी तरी कशी? या पद्धतीनें ती समूळ नाहींशी होणारच. एक प्राचीन ग्रंथकार म्हणतो कीं, 'या गोष्टीची मी पुष्कळ वेळां प्रतीती घेऊन पाहिली आहे, व तीवरून माझी तर अशी खात्री झाली आहे, कीं चांगल्या गुरूच्या हाताखालीं राहून जर विद्यार्थ्यांनीं अशा रीतीनें वर्ष दोन वर्षेपर्यंत निरनिराळ्या विषयांची चर्चा करून, त्यावर नानातऱ्हेच्या सयुक्तिक कल्पना लढवून, व नीट संगतवार विचार जुळवून, ते विषय लिहून काढण्याची, किंवा त्यांवर व्याख्यान देण्याची संवय

ठेविली, तर ते मोठे विचारवंत होतील. त्यांत ते तैलबुद्धीचे असल्यावर तर बोलायलाच नको. ते आपापल्या ग्राहकशक्तीनुरूप किंवा स्वभावानुरूप, मोठे वक्ते किंवा राजकार्यधुरंधर होतील, किंवा दोन्ही गुणांनीं युक्त होतील.'

मनन.—वक्त्यानें विषयाचें पुष्कळ मनन केलें पाहिजे. वक्तृत्वशक्तीचें रहस्य त्यांतच विशेष आहे. साधरणपणें शुद्ध अंतःकरणानें खरा विचार करणारे असे जगांत फारच थोडे पुरुष आढळतात. तेव्हां अशा लोकांपेक्षां जो कोणी विषयाचें मनन करून त्यावर खोल विचार करील, त्यास इतरांपेक्षां जास्त फायदा होणार हें उघड आहे.

या विषयावर इंग्लंडचे माजी मुख्य प्रधान ग्लॅडस्टनसाहेब यांचे फार पोक्त विचार प्रकट झाले आहेत, ते वाचकांनीं वाचण्यायोग्य आहेत, ह्मणून ते आम्ही खालीं देतों. चांगला वक्ता होण्यास उत्तम मानसिक कसरत कोणती असें एकदां त्यांस कोणी विचारलें; तेव्हां ते म्हणाले 'इंग्लंडसारख्या व्यवसायनिमग्न राज्यामध्यें हजारों प्रकारच्या उलाढाली करण्यांत, व त्यांसंबंधाची विशेष काळजी वाहण्यांतच तेथील कारभारी लोकांचा पुष्कळ वेळ जात असतो. ते त्यांत नेहमीं निमग्न असतात, यामुळें समाजांत उत्तम रीतीनें व्याख्यान देण्याच्या पद्धतीचें ज्ञान त्यांस दुसऱ्यांस करून देतां येत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या पद्धतीविषयीं विचार करून त्यांना स्वतःलादेखील तिचा उपयोग करून घेतां येत नाहीं. असें आहे तथापि, समजा कीं माझ्या मनांत तो प्रयत्न करून पाहावा असें आलें, तर मी आरंभीं दोन गोष्टी संपादन करण्याचा प्रयत्न करीन. एक सामान्यविष-

यक विद्या. कारण हें ज्ञान झाल्यानें मनाचे ठिकाणीं जसें मार्दव तत्परता आणि दार्ढ्य येतें, तसें इतर कोणत्याही साधनांनीं येत नाहीं. मी जी दुसरी गोष्ट करणार, ती नेमलेल्या संभाषणाच्या विषयाचें अगोदर चांगलें मनन करण्याची संवय ठेवणें, ही होय. विषयाचें अगोदर मनन झाल्यानें त्यापासून साहजिक रीतीनें आपल्याजवळ शब्दांचा भरणा पुष्कळ होऊन, आयत्या वेळीं ते शब्द आपल्याला आपोआप भराभर सुचूं लागतात.

लेखी विषय.—ज्या विषयावर भाषण करावयाचें, तो प्रथम लिहून काढण्याची संवय ठेवल्यास फार श्रेयस्कर होणार आहे. कारण विषय लिहून काढल्यानें, त्याचें विवेचन अगदीं रेखलेलें, मर्यादित व सुव्यवस्थित होत असतें. तसेंच बोलतांनां तोंडांतून निष्काळजीनें वाटेल तशीं वाक्यें निघत असतात, पण लिहितांनां कागदावर तशीं पडण्याचा संभव फारच कमी असतो. अमुकच विषय लिहावा असा नियम नाहीं. कधीं गोष्ट लिहावी, कधीं ज्यावर पुष्कळ विचार करावयाला सांपडेल असा विषय घेऊन, त्यावर निबंध लिहावा. कवित्वगुण अंगीं असेल तर एक चमत्कारिकसें कवन करावें. परंतु कधीं लिहावें, आणि कधीं आळसानें लिहूं नये, असें करून तें आपल्या लहरीवर आणि मर्जीवर टाकूं नये. तर नियमितपणें रोज लिहिण्याची संवय चांगली बरेच दिवस ठेवावी.

या लिहिण्याच्या पद्धतीसंबंधानें एक विशेष सांगण्यासारखा नियम आहे, व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांस पुष्कळ प्रकारें होणार आहे, तेव्हां तो येथें देणें अगदीं जरूर आहे.

तो नियम हा, कीं ज्या कोणत्याही विषयावर आपणांस लिहावयाचें असेल त्यावर झालेले ग्रंथ न पाहतां, आपल्याला जें सुचेल तें लिहिण्यास प्रथम आरंभ करावा. त्याविषयीं अगोदर आपल्या मनांत काय येतें तें पाहावें, सुचलेले विचार नीट जुळून मनांत कायम करावे, आणि नंतर ते कागदावर टिपावे; मग ग्रंथांतरीं तो विषय कसा प्रतिपादन केला आहे हें पाहावें. आतां हें पुष्कळ श्रमाचें काम आहे खरें, परंतु त्यापासून पुष्कळ फायदा आहे. लेखणी ही वक्तृत्वास एक प्रकारचें वळण देऊन तें शिकविणारी आहे, असें जें सिसेरो म्हणत असे तें यथार्थ होय.

एका प्राचीन ग्रंथकाराचें असें म्हणणें आहे, कीं आपल्याच्यानें लिहवेल तितकें लिहून, तें काळजीनें लिहावें. शेतांतील जमीन जितकी खोल खणावी, तितकी ती पोंकळ होऊन, तींत पीक चांगलें येतें, याचा अनुभव जे कोणी शेतकरी असतील त्यांस असेलच. वरवरचें ज्ञान संपादण्यापेक्षां वर सांगितलेल्या पद्धतीनें आपली मानसिक सुधारणा आपण करीत गेलों, तर खचित तिजपासून आपणांला उत्तम फळें मिळून, तीं चिरकाल राहतील. कारण आपण जर ही खबरदारी न ठेवली, तर कदाचित् आपल्याला समयस्फूर्तीनें बोलण्याची हातोटी जरी साधली, तरी तीपासून विशेषसा फायदा होणार नाहीं; फार झालें तर वेळेवर शब्द सुचून, नुसती बडबड मात्र करतां येईल. विषय लिहून काढणें, म्हणजे वक्तृत्व करतां येण्यास एक प्रकारचा पाया उभारण्यासारखें आहे. वक्तृत्वाच्या साहित्य-

संग्रहापैकींच लेखन हें एक आहे. त्यांतून प्रसंगानुसार आपल्याला जेवढें लागेल तेवढें काढून घेतां येणार आहे.

चांगलें बोलतां येण्यास प्रथम चांगलें लिहितां आलें पाहिजे, हें जरी खरें आहे, तथापि त्यावरून असें ह्मणतां येत नाहीं, कीं चांगलें लिहितां येण्यास बोलतांही चांगलेंच आलें पाहिजे. पुष्कळ मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले, परंतु त्यांस क्वचितच चांगलें बोलतां येत असे. याचें कारण ग्रंथकाराची स्मरणशक्ति राहावी तशी तरतरीत राहत नाहीं. विचारप्राबल्यामुळें ती दिपून जाऊन तिला मांद्य आलेलें असतें. हा तिचा मूळचा कमीपणा म्हणा, किंवा संवय नसल्यामुळें तसें होतें म्हणा. एखाद्या मनुष्याला घेरी आली, ह्मणजे त्याच्यानें जसें एक पाऊलही पुढें टाकवत नसतें, तसें संवय नसल्यानें मंडळीपुढें उभें राहिल्यावर मनाची जी काय चलबिचल होऊन जाते, तिच्यायोगानें त्याला कांहीं-एक सुचेनासें होतें.

भाषाविनेतृत्व किंवा **भाषेवर पगडा**.—भावी वक्त्यानें पुष्कळ दिवस अध्ययन करून व पुष्कळ विषय हातानें लिहून काढून, विचार प्रकट करण्याचे भाषेंत जितके ह्मणून प्रकार असतील, तितक्या प्रकारची निरनिराळी वाक्यरचना व समास वगैरे करण्याची संवय ठेविली पाहिजे. तिच्यायोगानें त्यास एक प्रकारचें उत्तम साधन होऊन, बोलतांनां अडखळण्याचे प्रसंगही क्वचित येतील, व मनांत आलेली एखादी कल्पना किंवा विचार तत्काळ लोकांपुढें मांडतां येईल.

जगांत जे मोठमोठे वक्ते होऊन गेले, त्या सर्वांनीं चांगलें बोलतां येण्यासाठीं ज्या पद्धतीचें अवलंबन केलें, त्या पद्धतीनें वक्तृत्व गुण संपादण्यास त्यांस पुष्कळ परिश्रम करावे लागले खरे; परंतु त्यापासून त्यांना जो अनन्वित फायदा झाला तो अवर्णनीय आहे. परंतु हाच त्यांनीं कंटाळा केला असता, तर त्यांस यश मुळींच आलें नसतें हें खचित. वुइल्यम पिट (अर्ल ऑफ चॅथम) याची गोष्ट अशी सांगतात कीं, त्यानें भाषाज्ञान चांगलें होण्याकरितां, व जवळ शब्दसंग्रहही पुष्कळ व्हावा म्हणून जॉनसनच्या पूर्वी बेलीसाहेबांनीं केलेला जो प्रसिद्ध कोश होता, तो दोनदां वाचून काढला; व पुढें त्यानें आपल्या मुलालाही तसेंच करण्यांचा उपदेश केला.

शब्दांचा भरणा जवळ चांगला होण्यास एका विद्वानानें एक चांगली युक्ती काढिली आहे ती अशी:—कोणतेंहि पुस्तक घेऊन त्यांतून कांहीं शब्द व वाक्यें वेगळीं काढावीं, व तसल्या अर्थाचे दुसरे निरनिराळे शब्द किंवा वाक्यें शोधून काढावीं. उदाहरणार्थ, 'मी इच्छितों,' याला 'माझा मानस आहे, माझा हेतु आहे, माझा विचार आहे,' वगैरे जितके शब्दसमुच्चय आठवतील, तितके आठवण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणें तिरस्कार, तिटकारा, कंटाळा, नावड, नाखुषी, वगैरे अनेक शब्द, व शुद्धीवर या, जागे व्हा, अंतःकरणांत उजेड पडूं द्या, डोळे, उघडा, वगैरे त्या त्या अर्थी अनेक शब्दसमुच्चयांची योजना करावी. आतां हा प्रकार अंमळ पोरकटसा दिसेल, पण त्यापासून उत्तम भाषण करतां येणार आहे.

वाक्यरचना करण्याची दुसरी अशी एक रीत आहे कीं, कोणतेंहि एक पुस्तक घ्यावें, त्यांतील ओळीवार पांच-पंचवीस वाक्यें दोनतीन वेळां वाचून काढावीं, नंतर पुस्तक मिटावें, आणि त्यांचा भावार्थ आपल्या स्वतःच्या भाषेंत लिहावा. असें करावयाला प्रथम एखादें गोष्टीचें पुस्तक मिळाल्यास उत्तमच. यांत थोडीशी गति झाली म्हणजे मग वादविषयक ग्रंथ हातीं घ्यावा. त्यांत थोडासा प्रवेश झाला कीं, दुसरें एखादें गहन विषयावर लिहिलेलें पुस्तक घेऊन पूर्ववत् वर्तन ठेवावें. याप्रमाणें संवय लागली म्हणजे त्यानें त्या पुस्तकांतील एक एक परिच्छेद किंवा प्रकरण वाचून, स्मरणार्थ टांचण करावें, आणि नंतर त्या टांचणावरून प्रकरणांतील आशय तोंडानें बोलण्याचा प्रयत्न करावा.

आणखी एक तिसरी रीत आहे, तिच्यापासूनही बराच उपयोग होण्याचा संभव आहे. ती रीत अशीः—एखादा पद्यात्मक ग्रंथ घेऊन, तो गद्यांत आणावा; आणि आपण जणूं काय कोणापुढें व्याख्यानच देत आहों अशी कल्पना करून, त्यांतील आशय तोंडानें म्हणत जावा. ही खुबी साधली म्हणजे मग कवीच्या कल्पनेवर जास्त आपली कांहीं कल्पना चालत असल्यास पाहावी. अशा रीतीनें मानसिक कसरत करणारास वाटेल तें शिकतां येईल. परंतु ही कसरत साधली मात्र पाहिजे; कारण ती मोठ्या विद्वानासदेखील कष्टसाध्यच होणार आहे.

आतां अशा प्रसंगीं त्याचें बोलणें ऐकण्यास कोणी नसलें, तरी हरकत नाहीं. अशी संवय करून घेते वेळीं खरो-

खर ऐकायाला कोणी नसेल तितकें बरें. मात्र विद्यार्थ्यानें, आपणास कांहीं काळानें जगापुढें येऊन बोलावयाचें आहे, ह्मणून आपण ही खटपट करीत आहों, तेव्हां आपल्या अभ्यासाच्या खोलींत कोणी ऐकणारे नसतांही, ती श्रोत्यांनीं गजबजून गेली आहे, व त्यांच्यासमोर आपल्यास हल्लीं बोलावयाचें आहे असें समजून, वर्णोच्चार वगैरे स्पष्ट करण्याची खबरदारी घ्यावी.

शब्दसंग्रह करावयाचा तोदेखील होईल तितका निवडक शब्दांचा असावा. शब्द निवडतांनां, बढाईखोराप्रमाणें वाचाळता करण्याकरितां आपण ही खटपट करीत नसून, वक्तृत्व संपादन करण्याकरितां करीत आहों, असें मनांत बाळगून, शब्दांची निवड केली पाहिजे. चांगल्या भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें वाचून, किंवा विद्वान लोकांचीं व्याख्यानें ऐकून देखील, वरील हेतु चांगला सिद्धीस जाणार आहे. वरील संवयीनें शब्दज्ञान होईल, एवढेंच केवळ नव्हे, तर शब्दाचा योग्य ठिकाणीं समर्पक उपयोग कसा करावा याचेंही ज्ञान होईल.

साजेल असा, साधा, व सभ्य पोषाख केल्यानें मनुष्यास जो मान मिळतो, तो छचोर किंवा डामडौली पोषाख केल्यानें मिळत नाहीं, व तो शोभतही नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट त्यापासून हलकटपणा मात्र दिसून येतो, व उपहासास कारण होतें. तसेंच कित्येक व्याख्यानकार एकदां शब्दलालित्य करावयास लागले ह्मणजे सर्व व्याख्यानांत त्याचीच झोड उडवून देतात. यामुळें प्रतिपाद्य विषयाचा सर्व जोर निघून जातो. ह्मणून श-

ब्दांची योजना करण्यांत, व त्यांतही विशेषेंकरून अर्थबोध होण्याविषयीं जास्त काळजी घेतली पाहिजे.

एका व्याख्यानांत निरनिराळ्या हजार शब्दांहून जास्त शब्दांचा उपयोग करणारा वक्ता क्वचितच सांपडेल, व त्यापेक्षां जास्त शब्दांची जरूरीही पण नसते.

इंग्लंडामध्यें चांगला विद्वान् जरी कोणी झाला, तरी त्याच्या साधारण बोलण्यांत तीन चार हजारांपेक्षां जास्त शब्द असत नाहींत. जे कोणी नीट विचार करून बोलणारे असतात, व मुद्दाम आपलें मनोगत व्यक्त करून दाखविण्यास योग्य शब्द शोधून काढण्याच्या भरीस पडतात, त्यांच्यापाशीं शब्दसंग्रह पुष्कळच असतो. जे कोणी उत्तम वक्ते ह्मणून नांवाजलेले असतात, त्यांच्याजवळ दहा हजारपर्यंत देखील शब्दभांडार असूं शकेल. मिल्टन् नामक एक प्रख्यात इंग्लिश कवि होऊन गेला; त्याच्या सर्व ग्रंथांत निरनिराळे आठ हजार शब्द आहेत.तसेंच निरनिराळ्या प्रकारची शब्दरचना करण्यांत प्रसिद्धीस आलेल्या शेक्सपीयरच्या ग्रंथांत पंधरा हजारांवर शब्द असावे असें म्हणतात.

वक्तृत्वसिद्धीस येणारीं विघ्नें.—आतां आपण वक्त्यास कोणत्या कोणत्या अडचणी येत असतात तें पाहूं. घरगुती मंडळींत, किंवा मोठ्या जनसमूहांत वक्ता पहिल्यानेंच बोलायला उभा राहिला, ह्मणजे त्यास आपली फजीती उडेल कीं काय अशी मोठी भीति वाटत असते. याप्रमाणें, कसें होईल, काय होईल, अशी धास्ती वाटून, तीच बहुतांशीं त्याच्या अपयशास कारणभूत होत असते. आणि असें त्यास एकदां अपयश आलें, ह्मणजे मग तो नादच सोडून

द्यावा, असा सहजीं त्याच्या मनाचा कल होतो. परंतु पहिल्या वेळीं अशी अकीर्ति झाली, ह्मणून त्यानें कच खाऊन निराश होऊं नये. अशा वेळेस शेरिडॅन, रॉबर्ट हॉल आणि अर्ल ऑफ बीकन्सफील्ड यांचीं उदाहरणें नजरेपुढें आणून त्यानें चित्ताचें समाधान करीत जावें. शेरिडॅनविषयीं असें सांगतात कीं, त्यानें पार्लमेन्ट सभेमध्यें जें अगदीं प्रथम भाषण केलें, त्यांत त्याची इतकी फजीती उडाली, कीं पुन्हां त्यानें भाषण देखील करूं नये ह्मणून त्याच्या मित्रमंडळींनें त्यास पुष्कळ उपदेश केला; पण त्यानें त्यांचें ऐकलें नाहीं. तो म्हणाला, 'कांहीं होवो, वक्तृत्वगुण माझ्यांत वास करीत आहे, तेव्हां तो कधीं तरी उदयास आल्यावांचून राहणार नाहीं, हें तुंम्हीं खास समजा.' तोच शेरिडॅन पुढें केवढा थोरला वक्ता झाला हें सुप्रसिद्धच आहे. रॉबर्ट हॉल ह्मणून एक मोठा विख्यात धर्मोपदेशक होऊन गेला. तोही पहिल्यानें असाच कच्चा होता, पण पुढें फार प्रख्यातीस आला. जेव्हां त्यास अगदीं पहिल्या प्रथम देवळांत उपदेश करण्याचा प्रसंग आला, तेव्हां तो एकदोन शब्द बोलून लागलींच थबकला, आणि शरमेनें तोंड झांकून मोठ्यानें म्हणाला, 'विसरलों हो, विसरलों, मी सर्व विसरलों; आतां मला कांहीं सुचत नाहीं.' दुसऱ्या वेळेस पहिल्याहीपेक्षां त्याची जास्त त्रेधा उडाली. लॉर्ड बीकन्सफील्डचें असेंच झालें. कॉमन्स सभेमध्यें त्याचें जें पहिलें भाषण झालें, त्यासंबंधानें तेथें मोठा हंशा पिकून मंडळींनें त्याची जी हुर्रेवडी केली, ती सर्वांस ऐकून माहीत असेलच. त्या प्रसंगीं तो खालीं बसतां बसतां ह्मणाला,

'कांहीं हरकत नाहीं, कधीं तरी मी आपलें भाषण तुह्मांस शांतपणें ऐकायला लावीन.' व त्याप्रमाणें त्यानें पुढें करूनही दाखविलें. ज्यांचा प्रसिद्धीस येण्याचा मनोनिग्रह झाला आहे, त्यांना हीं वरील महान् पुरुषांचीं उदाहरणें ऐकून जास्त हुरूप आल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

बोलण्याच्या कामांत पहिलें विघ्न ह्मटलें ह्मणजे भित्रेपणा हें होय. पण तो हळूहळू संवयीनें जातो. तो घालविण्यास प्रथम वादविवाद करणाऱ्या परिमित मंडळीमध्यें बोलण्याची सुरवात करून, नंतर मोठ्या श्रेष्ठ समाजापुढें उभें राहण्याची संवय करावी. याप्रमाणें कांहीं दिवस करीत गेलें असतां, पुढें समोर केवढाही मोठा समाज असला, तरी न डगमगतां, स्थिर मन करून व्याख्यान देण्याची अंगीं ताकद येते. ती आली म्हणजे मग आपल्या मनांत जें कांहीं खरें अगर खोटें म्हणून वागलें असेल, त्याचा ठसा दुसऱ्याच्या अंतःकरणावर कसा बठेल, एवढीच कायती काळजी असते.

दुसऱ्या पुष्कळ किरकोळ अडचणी वक्त्यास येत असतात, त्यांपैकीं एक ही कीं बोलतां बोलतां अर्धेंच वाक्य तोंडांतून निघून, पुढें घुटमळल्यासारखें होऊन, तें वाक्य तसेंच अपुरें राहतें. अशा वेळेस जेथून संदर्भ सुटला असेल, तेथून पुन्हां भाषणास सुरवात करावी, किंवा व्याकरणाच्या नियमाकडे लक्ष न देतां कशा तरी लटपटीनें तें वाक्य पुरें करावें. या दोहोंपैकीं दुसरा प्रकार पसंत दिसतो. कारण ह्या वेळीं श्रोत्यांचें लक्ष व्याकरणाकडे वि-

त्याच्या प्रचंड फौजेंतील प्रत्येक शिपायाचें नांवगांव वगैरे माहिती त्यास विचारून घ्यावी; ती तो खडानूखडा सांगत असे.

साधारणतः मनुष्याची स्मरणशक्ति मूळची कोती असते, असा नियम आहे. ती कोती असण्याचें कारण बहुधा असें आहे, कीं हरएक गोष्टीकडे लक्ष पुरवून आपली स्मरणशक्ती वृद्धिंगत करण्याची, व मंडळींत मिसळून त्यांच्याशीं नेहमीं दळणवळण किंवा सहवास ठेवण्याची संवय मनुष्य आपल्याला लावून घेत नाहीं. ती लागून, तो हरएक गोष्टीकडे लक्ष पुरवूं लागला, आणि मंडळींत मिसळूं लागला, ह्मणजे स्मरणशक्ति कोती आहे असें म्हणण्यास मुळींच जागा राहणार नाहीं.

स्मरणांत ठेवणें.—कोणताही संभाषणाचा विषय ध्यानांत धरण्याची उत्तम रीत ह्मटली ह्मणजे, त्याचे वेगवेगळे लहान भाग पाडावे; नंतर एक चांगला शिकून तयार करावा, व तो तयार झाला कीं दुसरा, दुसरा झाला, कीं तिसरा, अशा रीतीनें सर्व भाग शिकून विषय तयार करावा. न्यायशास्त्राच्या पद्धतीनें विषयाचे विभाग केले ह्मणजे ते ध्यानांत ठेवण्यास फार सोपें जातें.

पाठ करण्याचा उत्तम वेळ ह्मटला ह्मणजे रात्रीं निजावयास जाण्याच्या अगोदरचा आहे. मात्र पूर्वी जाड्य येईं अशा रीतीनें जेवूं नये ह्मणजे झालें. सकाळीं उठल्याबरोबर रात्रीं पाठ केलेलें पुन्हां ध्यानांत आणून, त्यास उजळणी द्यावी. स्मरणशक्ति जागृत नसल्यानें प्रसंगविशेषीं मोठे अघोर परिणाम घडून येतात, असें खालीं दिलेल्या एका ऐतिहासिक

उदाहरणावरून वाचकांस कळून येणार आहे. एकदां लिनसेस्टीस नांवाच्या कोणा एका शिपायावर ॲलेक्झांडर बादशहाविरुद्ध फितुरी करण्याविषयीं कांहीं कट केल्याचा आरोप येऊन बादशहानें त्यास एकाएकीं कारागृहांत ठेवलें. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर त्या वेळेच्या रीतिरिवाजाप्रमाणें, त्याजवरच्या आरोपासंबंधानें त्याचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेण्याकरितां आरोपीला जेव्हां सैन्यासमोर उभें केलें, तेव्हां आरोपी लिनसेस्टीस याला आपल्यावर आलेल्या आरोपासंबंधानें जें कांय सांगावयाचें होतें, तें त्यानें कारागृहांत असतां चांगलें पाठ करून ठेवलें असतांही, स्मरणशक्ति धड नसल्यानें चमत्कार असा झाला कीं, वेळेवर त्यास कांहींएक न सुचून कांपरें सुटल्या सारखें झालें, आणि तोंडांतून एक ब्रही निघेना, इतका तो भयचकित झाला होता. परंतु त्याचा असा प्रकार पाहून सभोंवतीं असलेल्या शिपायांचा भलताच समज झाला. त्यांना काय वाटलें, कीं इतके दिवस लिनसेस्टीस हा तुरुंगांत राहून त्यास आपला जबाब तयार करण्यास पुष्कळ सवड असतांही तो त्यास देतां आला नाहीं, तेव्हां त्यास तो आठवला नसेल असें ह्मणतां येत नाहीं; तर खरोखरच आपण अपराधी आहों, अशी त्याची मनोदेवता त्यास साक्ष देत असल्यानेंच तोंडांतून एक चक्कारशब्द काढण्यास देखील त्याला धैर्य झालें नसावें; तेव्हां त्यानें अपराध केला हेंच खरें, अशी त्यांची चमत्कारिक समजूत होऊन त्यानीं त्यास तत्काळ आपल्या भाल्यांनीं भोंसकून यमसदनास धाडिलें.

व्याख्यान देण्याची कला.—ही कला वक्त्यास चांगली साधली पाहिजे. हिच्यासंबंधानें पुष्कळच सांगावयाचें आहे; पण तें पुढें सांगूं. प्रस्तुत वक्त्याच्या गुणांबद्दल सिसेरोचे जे विचार आहेत ते येथें देऊन हा भाग संपवितों. तो ह्मणतोः—

'वक्त्याचे अंगीं नैय्यायिकाची तीव्रता, तत्ववेत्त्याचें शहाणपण, कवीची कल्पना व त्याची भाषा, वकिलांची स्मरणशक्ति, व उत्तम नाटककारांचे अंगविक्षेप व भाषणशैली वगैरे बरेच गुण असावे लागतात. परंतु असा सर्वगुणसंपन्न वक्ता फारच दुर्मिळ. इतर कलांप्रमाणें वक्तृत्वकलेचें नाहीं. कारण इतर शाखांत निष्णात असणाऱ्या पंडितांमध्यें कांहीं गुण जरी बेताबातानें वास करीत असले तरी चालण्यासारखे असतात. परंतु तेच गुण वक्त्यामध्यें तशा प्रमाणानें असून उपयोगाचे नसतात. ते ओतप्रोत भरलेले असतील तरच तो स्तुतीस पात्र होऊन उत्तम वक्ता ह्मणून गणला जातो.'

भाग ४ था.

वक्तृत्वाचे प्रसंग आणि त्यांचीं स्थलें.

वक्तृत्व निरनिराळ्या प्रसंगीं त्या त्या प्रसंगास उचित असें निरनिराळ्या प्रकारचें करावें लागतें. असले प्रसंग ह्मणजे वक्तृत्व करण्याचीं स्थळें पांच मानिलीं आहेत. पहिलें, पुलपिट किंवा व्यासपीठ. येथें धर्मसंबंधी विषयांवर वादविवाद चालतात. दुसरें, न्यायासन. येथें कायद्यासंबंधाचा कोटिक्रम करण्याचें काम चालतें. तिसरें, लोकनियुक्त सभा. येथें राजकीय विषयांवर वाटाघाट चालून त्यांची भवतिनभवति होते. चवथें, सार्वजनिक जागा. ह्या ठिकाणीं सार्वजनिक हिताहिताच्या गोष्टींचा विचार होऊन बरीच चर्चा चालते. पांचवें, घरगुती प्रसंगांत आदरातिथ्य करतांनां जीं बोलणीं चालतात तीं. पूर्वी वक्तृत्वाचे तीन प्रकार चालू असत. पहिला 'निंदास्तुतिपर,' दुसरा 'विषयविवेचनपर,' आणि तिसरा 'न्यायसंबंधी.' निंदापर किंवा स्तुतिपर भाषण पहिल्या प्रकारांत मोडत असे. दुसऱ्या प्रकारांत, कांहींएक गोष्ट करावी कीं न करावी, अशाबद्दल उपदेश केला जात असे. तिसऱ्या प्रकारच्या वक्तृत्वाचा उपयोग, बहुशः, एखाद्याला दोषी ठरविण्यांत, किंवा दोषमुक्त करण्याचे कामीं, होत असे. स्मशानभूमीवर होणारीं व्याख्यानें पहिल्या प्रकारच्या

वक्तृत्वपद्धतीखालीं येत, आणि समाजांत कांहीं विषयांची वाटाघाट होत असे, ती करतांनां दुसऱ्या प्रकारच्या वक्तृत्वाचा उपयोग करीत; तिसऱ्या प्रकारचें वक्तृत्व न्यायाच्या कोर्टांपुढेंच फक्त होत असे; अशी पूर्वींची व्यवस्था होती, ती कांहीं वाईट नव्हती; परंतु वरीलप्रमाणें वक्तृत्वाचे पांच भाग केल्यानें जास्त स्पष्टता होऊन, सहज समजूत पडण्यासारखी आहे. वर ज्या वतृक्त्वाच्या जाती केल्या आहेत, त्या प्रत्येकीस निरनिराळी पद्धति आहे. त्या पद्धतींचें स्वरूप कळणें अगदीं अवश्य आहे. प्रधानाच्या बोलण्याहून वकिलाचें बोलणें कांहीं निराळेंच असतें; आणि त्याहीपेक्षां मुत्सद्याचें भाषण तर फारच भिन्न.

पुलपिट (व्यासपीठ).–धर्मसंबंधी व्याख्यानें देतांनां वक्त्यास किती अडचणी सोसाव्या लागतात याचा आपण येथें विचार करूं. धर्मसंबंधी व्याख्यान ह्मणजे नेहमीं आपण बोलतों तसें बोलणें, असा लोकांचा साधारण समज झालेला असतो. परंतु वाचकांनीं हें लक्षांत आणलें पाहिजे, कीं वकील किंवा मुत्सद्दी यांना बोलण्यास नेहमीं ताजे विषय मिळत असतात, यामुळें त्यांच्या मनांत प्रत्येक खेपेस नवीन नवीन विचार सुचण्यास जागा असते. त्यांत त्यांना थोडेंसें भाषाज्ञान असून, आपले विचार प्रकट करण्याचें अंगीं सामर्थ्य असलें, ह्मणजे मग त्यांना दुसरी कांहीं तयारी करावी लागत नाहीं. असें जरी आहे, तरी देखील त्यांना नेहमीं तोच तो विषय दिला, आणि पूर्वींचीच मंडळी ऐकायला असली, ह्मणजे पूर्वीप्रमाणें मंडळीच्या मनावर ठसा उमटविण्यास नवीनच आधार आणि

दाखले द्यावे लागतात. त्याशिवाय त्यांचें भाषण पूर्वी-प्रमाणें चटकदार आणि वजन पडण्यासारखें होत नाहीं. तसा प्रकार धर्मोपदेशकांचा नाहीं. धर्मसंबंधी उपदेश करण्याचा त्यांचा धंदाच पडल्यानें, त्यांच्या व्याख्यानाचा नेहमीं एकच एक विषय असतो, व त्यांत तेच ते विचार पुनः पुनः येत असतात. जों जों ते आपला इष्ट हेतु साधण्याची खटपट करूं पाहतात, तों तों त्यांस आपल्या जवळ असलेली सामग्री फार अपुरी आहे असें पाहून फार वाईट वाटतें. आपली पुंजी होती तेवढी आपण श्रोतृमंडळीपुढें ओतली आहे, परंतु सत्याविषयींची त्यांच्या मनाची खात्री पटण्यास तेवढी बस होणार नाहीं, त्यांच्या हृदयांत सत्याचा उजेड पाडण्यास ह्या वेळेस आपल्या अंगीं कांहीं अद्वितीय विचारशक्ति असावयाला पाहिजे होती, तसेंच तें सत्य त्यांच्या निदर्शनास आणून देण्यास कांहीं प्रत्यक्ष प्रमाणें दाखविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं असलें पाहिजे होतें, कारण तसें केल्याशिवाय लोकांस आपला खरेपणा वाटणार नाहीं, व त्यांची खात्रीही पण व्हावयाची नाहीं, असें त्यांस राहून राहून वाटत असतें.

तथापि एवढें खरें आहे, कीं जर एखादा धर्मोपदेशक ह्मणेल, कीं मी किरकोळ मंडळीसमोर कांहींएक तयारी न करितां जसें धर्मपर व्याख्यान देऊं शकेन, तसें विद्वान् लोकांपुढेंही देईन, तर त्याचें ह्मणणें बिलकुल शोभणार नाहीं. त्याची ती तयारी पाहून, तो विद्वत्समूह खरोखर संतापून जाईल, व त्याची पुष्कळ निर्भर्त्सना करील.

धर्मोपदेशकाचें काम, लोकांची खात्री करून देण्या-पेक्षां विशेषेंकरून त्यांचें मन वळविण्याचें असल्यामुळें त्यानें त्यांच्या विचारशक्तीशीं न बोलतां, मनोवृत्तीशीं बोलत असावें. ह्मणजे असें कीं त्यांना फारसें विचारांत गुंतूं न देतां, त्यांचे मनोधर्म जेणेंकरून आपल्या बाजूस वळतील असें करावें. त्याच्या भाषणांत प्रौढता, थोडासा आवेश, आणि खरी कळकळ, किंवा उत्साह हे गुण असले पाहि-जेत. धर्मसंबंधी विषयाचें महत्व फार मोठें असल्याकारणानें त्याचें प्रतिपादनही गंभीरपणानेंच झालें पाहिजे; व मोठ्या आस्थेनें त्या विषयाचें महत्व लोकांस कळवून दिलें पाहिजे. परंतु इतक्या गोष्टींचें धोरण ठेवून भाषण करणें, ह्मणजे साधारण काम नाहीं. कारण गंभीरपणाचें जरा जास्त प्राब-ल्य झालें कीं तेथें स्थिरता आणि ढिलाई आलीच. तसेंच ज्यांत आवेश व कळकळ आहे परंतु गंभीरपणाचा अभाव आहे तें भाषण निव्वळ नाटकवजाच भासणार, अशी मोठी पंचाईत असते. याकरितां आपल्या भाषणाच्या जुळणींत, व तसेंच तें करण्यात, गंभीरपणा, आवेश, आस्था, व-गैरे अवश्य लागणारे गुण एकसमयावच्छेदेंकरून दिसण्यांत येतील, असें करण्याविषयीं धर्मोपदेशकानें विशेष काळजी घेतली पाहिजे. यासंबंधानें क्लेअरसाहेबांनीं कांहीं नियम घालून दिले आहेत, ते आह्मी सारांशरूपानें खालीं देतों.

नियम १. कोणता तरी एक मुख्य विषय धरून त्या-वर व्याख्यान देत जावें; अनेक विषयांचा एका व्याख्यानांत समावेश करूं नये.

२. विषय जितका मर्यादितपणें प्रतिपादन केला जाईल, तितकें लोकांच्या मनावर त्याचा चांगला ठसा उमटाविण्यास सोपें पडेल.

३. मनांत आलेले सर्व विचार एकदम सांगून टाकूं नये. ते एकदम बोलून दाखविणें ही चूक आहे. कारण त्या योगानें वक्त्याचा घोंटाळा होऊन, भाषणाचाही जोर कमी होतो.

४. जें सांगावयाचें तें गोड आणि सुरस अशा शब्दांनीं सांगावें, ह्मणजे त्यापासून आपल्या भाषणाला रंग येऊन, श्रोत्यांना उपदेशाचा उपदेश होतो आणि त्यांचें मनरंजनही होतें.

५. अलीकडे लोकांना अमुक एक पद्धत आवडूं लागली आहे, तेव्हां तीच आपण घ्यावी, असें कधीं करूं नये. त्यांचाच कित्ता वळवून उपयोगी नाहीं. कारण असल्या पद्धती ह्मणजे आळवावरच्या पाण्यासारख्या असतात. त्या आज आहेत, उद्यां नाहींत. लोकांची अभिरुचि घटकोघटकीं बदलत असते. त्या आज आवडत आहेत खऱ्या, परंतु उद्यां त्याच बहुमतानें नापसंत ठरल्या, कीं गेल्या उपयोगांतून! कधीं कधीं लोकांना काव्यधाटी आवडते, कधीं तत्वज्ञानप्रचुर व्याख्यानाची हौस वाटते; केव्हां केव्हां हृदयद्रावक व्याख्यानाची गोडी असते; केव्हां वादविवादप्रधान विषय पसंत पडतो. अशी त्यांची भिन्न वेळीं भिन्न प्रकारची अभिरुचि असते. ह्या सर्व पद्धती परमावधीस गेल्या असतां त्या दूषणार्ह होतात. तेव्हां जे कोणी

ह्या पद्धती स्वीकारण्याच्या नादीं लागतील, ते आपल्या बुद्धीवर व्यर्थ ओझें लादून तिचा नाश मात्र करून घेतील, यांत संशय नाहीं.

उपदेशकांनीं उपदेश करावयाचा तो पद्धतवार करण्यास शिकलें पाहिजे. त्यांच्या अंगीं समयोचितपणा असावा; आवेशाचा अविर्भाव असावा; वाणी मधुर असून स्मरणशक्ति चांगली असावी; पर्यवसान केव्हां करावयाचें याचें धोरण असावें; तसेंच आपलीं मतें खरीं आहेत, अशी त्यांची त्यांस खात्री झालेली असावी. एकंदरींत या कामीं त्यांनीं जीव तोडून मेहनत केली पाहिजे. तसेंच कोणी थट्टा करो, किंवा निंदा करो, ती सर्व निमूटपणें सहन करण्यास त्यांनीं शिकलें पाहिजे.

व्याख्यानाचें लांबच लांब चऱ्हाट वळून श्रोत्यांस तें कंटाळवाणें होईल असें करूं नये; कारण असलें व्याख्यान ऐकण्याचा त्यांस मुळींच उल्हास नसतो, त्यांत तें कंटाळवाणें झालें ह्मणजे मग, 'आधींच हौस आणि त्यांत पाऊस' या ह्मणीप्रमाणें होतें; व बोलणाराचाही त्यामुळें कार्यभाग होत नसतो. श्रोत्यांच्या मनाची स्थिती पाहून त्याप्रमाणें उपदेश करीत जावें. पुष्कळांना हें तत्व कळत नसतें. अशांच्या उपदेशाचा परिणाम साध्या भोळ्या मंडळीवर मुळींच घडत नसतो. सरळ आणि सुरस अशा भाषेनें उपदेश करणें फार कुशलतेचें काम आहे. आपण जसें घरीं बोलतों, तशा प्रकारच्या साध्या भाषेंत उपदेश केला असतां, तो चांगला वठतो. चांगलें व्याख्यान देतां येण्यांत मोठें महत्व व भूषण आहे. परंतु असें व्याख्यान

देणारे फारच थोडे उपदेशक आढळतात. उपदेशकानें आपल्या भाषणांत एकच एक सूर काढूं नये. कित्येकांना गोरेंमोरें तोंड करून स्फुंदत स्फुंदत बोलण्याची खोड असते, परंतु ती चांगली नाहीं; कारण व्यासपीठासारख्या ठिकाणीं धर्मासारख्या पवित्र विषयावर बोलतांनां अशा स्वैरचेष्टा करणें किती अप्रशस्त होणार आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

वकिली.—वादविवाद करणाऱ्या मंडळीच्या सभेमध्यें जी भाषणपद्धति प्रशस्त मानिली जाते, तिचा न्यायाच्या कोर्टांत बोलतांनां उपयोग करणें फार गैर आहे. तिचें त्या ठिकाणीं अवलंबन करणारास अपयश आणि कमीपणा हीं हटकून येणारिच. वकिलानें त्या पद्धतीचा अंगीकार केला, कीं त्याचा सर्वस्वी नाश झालाच ह्मणायचा. फार नको, सुमारें सहा महिनेपर्यंत सतत जर त्यानें न्यायाधीशासमोर ह्या पद्धतीनें बोलण्याची सुरुवात केली, तर तिच्या पायीं त्याच्या माथ्यावर अपयशाचें खापर फुटून, आमरण त्यास दोम दोम करीत फिरावें लागेल, यांत तिळमात्र संदेह नाहीं. याकरितां अशी ही घातक संवय ज्यांच्या अंगवळणीं पडून खिळत चालली असेल, त्यांनीं ती समूळ दवडण्याचा प्रथम प्रयत्न करावा. वकिलाचें भाषण ह्मणजे अगदीं साधें, स्पष्ट आणि प्रचारांतलें असावें, कीं तें ऐकतांक्षणींच ऐकणाराच्या अंतःकरणांत चक्क खासा उजेड पडावा. आपण एकमेकांशीं ज्याप्रमाणें साधारणपणें बोलत असतों, तद्वत् वकिलाचें भाषण असावें. न्यायासनापुढें वाक्पांडित्य केलें तर त्यानें त्याचें हंसें होणार आहे.

दुसरी एक विशेष महत्वाची गोष्ट वकिलानें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं आपल्याला जूरीचें मन वळवून न्यायाधीशाचीही खात्री करून दिली पाहिजे, तेव्हां ह्या गोष्टी जेणेंकरून साधतील, असें सयुक्तिक भाषण आपल्याकडून झालें पाहिजे, तरच भाषणाचा उपयोग होणार आहे.

जूरींत असलेल्या लोकांना न समजण्यासारख्या भाषेंत बोलणारे पुष्कळ वकील दृष्टीस पडतात. परंतु असें दुर्बोध भाषण करणें ही त्यांची मोठी चूक समजली पाहिजे. वास्तविक ह्मटलें तर जूरीमध्यें सर्वांत कमी शिकलेला जो कोणी असेल, त्याची समजूत होईल अशा भाषेचा तेथें करवेल तितका उपयोग केला पाहिजे. जूरीला उद्देशून जें बोलावयाचें तें सरळ व सोप्या भाषेंत, आणि हास्यमुख करून बोलत जावें; व आपला पक्ष सबल आहे असें दर्शित करण्यास नेहमीं झटावें. विद्वान् लोकांची जूरी असेल तेव्हां मात्र भाषण मोठें खुबीचें, जोरदार आणि विचाराचें व्हावें लागतें. परंतु येथें हें अवश्य सांगितलें पाहिजे, कीं कशाही लोकांची जूरी असो, विद्वानांची असो, किंवा गैरविद्वानांची असो, वाजवीपेक्षां जास्त बोलून तिला कंटाळा येईल असें कधीं करूं नये. जूरीला कंटाळा आला आहे असें दिसून आलें, कीं लागलीच आपल्याला जरी जास्त कांहीं सांगावयाचें असलें, तरी तें न सांगतां आपलें बोलणें आंखडतें घेऊन खालीं बसावें. यांतच शहाणपणा विशेष आहे. कारण असें जर न केलें, तर आपलें मागचें पुढचें सर्व बोलणें व्यर्थ

जाऊन, आपल्या पक्षासंबंधानें यदाकदाचित् जूरीचा अनुकूल असा ग्रह झाला असला, तर तोही नाहींसा होईल; आणि मग आपला मूर्खपणा आपल्यास भोंवून, विनाकारण अपयश घेऊन घरीं परत यावें लागेल.

न्यायाधिकारी लोकांसमोर बोलतांनां निराळ्या प्रकारची, ह्मणजे विद्वान् व विचारी लोकांस पटेल अशी, पद्धत स्वीकारली पाहिजे. आपले विचार व आपलें भाषण अगदीं मर्यादशील असून त्याची सरणी न्यायशास्त्ररीतीला धरून असावी. बोलण्याच्या इतर रीतीभातींकडेही दुर्लक्ष करितां कामा नये. सभ्य रीतीनें कसें बोलावें हें ज्याला ठाऊक नसेल, अशाचेंही बोलणें न्यायाधीश ऐकतो, नाहीं असें नाहीं. परंतु बोलण्याच्या चालीरीती माहीत असलेल्या मनुष्याची गोष्ट कांहीं निराळीच आहे. त्याच्या गौरवयुक्त भाषणानें न्यायाधीशाच्या मनावर जसें वजन पडेल, तसें इतर मनुष्याच्या रीत सोडून बोलण्यानें पडणार नाहीं, हें निर्विवाद आहे. चांगल्या भाषणाचा परिणामही चांगलाच व्हावयाचा. लोकसमाजांत होणाऱ्या भाषणापेक्षां, वकील या नात्यानें न्यायाधीशापुढें होणारें आपलें भाषण फार सौम्य, मर्यादशील व शुद्ध रीतीचें असावें लागतें. ही गोष्ट मनांत आणून ब्लेअरसाहेबांनीं होतकरू वकिलांस उपदेशरूपानें पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्या येथें देणें इष्ट वाटल्यावरून खालीं दिल्या आहेत, तिकडे वाचक लक्ष पुरवितील अशी उमेद आहे. ते ह्मणतात—'न्याय व इनसाफसंबंधानें पूर्वींच्या लोकांची जी वक्तृत्वपद्धति होती तिचें अनुकरण हल्लीं अगदीं करूं नये. सिसेरो,

डिमॉस्थेनीस यांचा देखील त्या कामांत कित्ता घेणें हल्लींच्या प्रसंगास उचित होणार नाहीं. कारण हल्लीं ज्याप्रमाणें लोकसमाजांत व्याख्यान दिलें जातें, तशाच मासल्याचें व्याख्यान ग्रीस व रोम येथील न्यायासनांपुढें करण्याचा प्राचीनकाळीं रिवाज होता. तशा पद्धतीनें भाषणें न करण्याचीं मुख्य दोन कारणें आहेत.

इनसाफ करण्याचे कामीं हल्लीं जसें कायद्याकडे लक्ष पोंचविलें जात आहे, तसें पूर्वीच्या काळीं नव्हतें. डिमॉस्थेनीज आणि सिसेरो ह्यांचे वेळीं व्यवहारसंबंधाचे स्थानिक कायदे फारच थोडे असतील, किंबहुना नव्हतेच असें ह्मटलें असतां चालेल; आणि जे होते ते स्थूल मानाचे, अगदीं ठोकळ आणि साधे असे होते. तेव्हां न्यायाधीश खटल्याचा निकाल फक्त समता व तारतम्य यांस धरून बहुधा करीत. ह्या कारणामुळें वकील लोकांचें लक्ष, कायदेकानू, लोकांच्या रीतीभाती, व त्यांचे हक्क ह्यांविषयींचें ज्ञान करून घेण्याकडे विशेष नसून, केवळ वक्तृत्वविषयाकडे फार असे. सिसेरोनें एके ठिकाणीं असें देखील ह्मटलें आहे, कीं ‘ मनुष्यास कायद्याचें ज्ञान चांगलें होण्यास तीन महिने अगदीं बस होणार आहेत. इतकेंच नाहीं, तर ज्यास कायद्याचा नुसता गंधही नाहीं असा मनुष्य वकिलीचें काम बिनदिक्कत चांगलें करूं शकेल.’ ह्यावरूनच त्या काळीं चालू असलेल्या कायद्यांच्या संख्येचें अनुमान होणार आहे. ह्याचें कारण असें कीं त्या काळीं रोमन लोकांमध्यें एक ठराविक मंडळी असे, व ह्या थोड्याशा मंडळीला मात्र त्या वेळच्या कायदे-

कानूंचें ज्ञान असे, व जो कोणी चांगला वक्ता होऊन वकिली करावयाला लागे, त्यास त्याच्या खटल्यासंबंधानें लागणारी कायद्याची माहिती ही मंडळी देत असत. अशी माहिती मिळाल्यावर त्याला काय करावयाचें राहिलें? फक्त तिला वक्तृत्वाचीं एक दोन पुटें काय द्यावयाचीं तीं देऊन, न्यायाधीशाचें मन वळवून तो आपलें काम करून घेत असे. दुसरें असें कीं ग्रीस व रोम येथें दिवाणी आणि फौजदारी काम चालविणाऱ्या न्यायाधीशांची संख्या त्या काळीं हल्लीं आपल्या इकडे आहे त्यापेक्षां फार जास्त होती. ज्या वेळीं सॉक्रेटिस याजवर कांहीं आरोप येऊन, न्यायाचे कोर्टासमोर त्याची चौकशी सुरू झाली, त्या वेळीं त्याच्याविरुद्ध मत देणारे न्यायाधीश दोनशेंऐशीं होते, यावरून एकंदर न्याय देणारी मंडळी किती असेल हें लक्षांत आणा. अशी त्या काळची स्थिति असे, ह्मणूनच रोमन वक्त्यांस आपल्या वाक्चातुर्यानें न्यायाधीशांस वश करून घेऊन, काम करून घ्यावें लागत असे. ते आपली गरीबी दाखवून, रडून भेंकून, कसेंही ह्मणा, न्यायाधीशाला द्रव आणून आपला कार्यभाग उरकून घेत. प्रसंग पडल्यास जे प्रकार आपण हल्लीं नाटकी असे मानतों, ते करून ह्मणजे आरोपीस दुःखप्रदर्शक पोषाख देऊन, कोर्टापुढें उभे करीत. त्याचीं चिलीपिलीं, बायकापोरें, गणगोत यच्चयावत् सर्व मंडळी तेथें येऊन, दीन स्वरानें न्यायाधीशांची करुणा भाकीत. मग त्यांचें चित्त कां न द्रवेल? खाईन खाईन करीत असलेल्या मोठ्या पाषाणहृदयी मनुष्यास देखील, त्यांचा तो आक्रोश आणि दीन

मुद्रा पाहून, प्रेमपाझर सुटल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां त्या विचारी व सदय अंतःकरणाच्या रोमन व ग्रीक न्यायाधीशांस द्रव येत नसेल, असें कोण ह्मणेल ?

असो. अशा रीतीनें वकील लोक आपआपल्या तर्फे प्राचीन काळीं निकाल करून घेत.

स्वपक्षसमर्थनार्थ जें भाषण करावयाचें, त्यामध्यें खरी कळकळ आणि थोडासा तरी आवेश दिसून आला पाहिजे. समाजापुढें बोलतांनां आवेश साहजिक येतोच; परंतु जूरी-समोर किंवा न्यायाच्या कोर्टापुढें भाषण करतांनां देखील तितकाच आवेश आणि उत्कंठा हीं प्रदर्शित झालीं पाहिजेत; ह्मणजे त्यायोगानें जूरीचें आणि न्यायाधीशाचें मन लव-कर वळणार आहे. वकील ह्मणजे साक्षात् कूळच झटला पाहिजे. कुळाची नफानुकसानी सर्व वकिलाच्या शिरावर असते. तो कुळाच्या वतीनें उभा राहत असतो. तेव्हां तो जर कुळाप्रमाणें हातीं घेतलेल्या कामांत उत्साहबुद्धी न दाखवितां, औदासीन्य प्रकट करील, तर त्यास यश ह्मणून कधींच येणार नाहीं; व त्यामुळें त्याचा धंदा अगदींच बसून जाईल. कारण त्याची ती अनास्था पाहून कुळेंही त्याच्याकडे कामें नेण्याचें बंद करितील.

राज्यकारस्थानी मंडळीच्या भाषणांत दांभिकपणा नसावा. त्यांचें भाषण अस्खलित निघून, तारतम्यास धरून असलें, ह्मणजे पुरे असतें.

पार्लमेन्टसारख्या सभेमध्यें वक्तृत्व करण्याचे प्रसंग फारच थोडे येतात. तथापि खऱ्या गोष्टीच्या प्रतिपादनार्थ तेथें तार-तम्याची जरूर विशेष असते. एकंदरींत अशा सभांमध्यें

बोलण्याचा मुख्य हेतु सभासदांचें मन वळविणें हा असतो. तेव्हां तो साधेल अशी पद्धत त्या ठिकाणीं योजिली पाहिजे.

प्लॅटफॉर्म (लौकिक कृत्यांच्या विचारार्थ सार्वजनिक स्थळें.)— ह्या ठिकाणीं जनसमूहास उद्देशून व्याख्यान देण्याचा प्रघात असून तेथें सर्व प्रकारचीं भाषणें होतात. पार्लमेंटचा सभासद आपल्या मतदार लोकांस जें व्याख्यान देतो तें त्याचप्रमाणें राज्यकारस्थानसंबंधानें चळवळ करणारी मंडळी ज्या रीतीनें आपलीं मतें प्रगट करतात ती, आणि ज्या व्याख्यानांमध्यें लोकमताकडे दाद मागितली जात असून, सर्व लोकांची मनें आपणाकडे वळवून घेण्याचा वक्त्याचा प्रयत्न असतो, तीं सर्व व्याख्यानें प्लॅटफॉर्मवर होत असतात. असलीं व्याख्यानें ऐकणारा श्रोतृसमाज तरी कसा असला पाहिजे, त्याच्यासंबंधानें वक्त्याचा समज कसा असावा, कशा रीतीनें अशा समाजावर त्याचें वजन पडेल, वगैरे गोष्टींचें दिग्दर्शन पुढें केलें आहे. अशा ठिकाणीं कशा प्रकारें व्याख्यान द्यावें, हें मात्र येथें सांगितलें आहे. प्लॅटफॉर्मवर जें व्याख्यान द्यावयाचें तें साधें परंतु जोरदार असें असावें. नेहमींच्या प्रचारांत जे शब्द, व जीं उदाहरणें आपण योजतों, तींच येथें उपयोगांत आणावीं; वक्त्याच्या मनांतील विचार कसेही असोत, ते व्यक्त करून दाखवितेवेळीं आबालवृद्धांस कळेल अशा भाषेंत ते सांगावे. विचार पोक्त व शहाणपणाचे असावे; व ते साधारण लोक जसे बोलतात तसें बोलून प्रकट करावे; परंतु बोलतांनां तोंडांतून सहज रानवट किंवा अश्लील शब्द न निघतील, अशाबद्दल फार खबर-

दारी ठेवावी. निरनिराळे कल्पनातरंग चालवून व रूपकादि अलंकार योजून, भाषेला शोभा आणली असतां, श्रोत्यांचें चित्त वेधण्यास सुलभ जातें खरें. परंतु कोठेंही पहा, ' अति सर्वत्र वर्जयेत्, ' हें वाक्य खरें ठरतें. सर्वत्र अलंकारांनीं भरलेलें भाषण नुसतें भपकेदार दिसतें मात्र; बाकी परिणामीं गोड नसतें. असें ज्याचें भाषण असतें, त्याचा लोक उलट उपहास करतात; व तो त्यांच्या मर्जीतून तेव्हांच उतरतो. समाजव्याख्यानामध्यें श्रोत्यांच्या मनोवृत्तींचें उद्दीपन करण्यांत जो फायदा आहे, तो त्यांच्याशीं बुद्धिवाद करण्यांत नाहीं, ही गोष्ट वाचकांनीं पक्की लक्षांत ठेवावी. त्याचप्रमाणें वक्त्याच्या भाषणांत थोडासा विनोदही असावा, ह्मणजे त्या योगानें तो सर्व मंडळीला हंसवून सोडील, व व्याख्यानाला चांगला रंगही येईल.

समाजव्याख्यानाचा उत्तम मासला पाहणें असल्यास, वाचकांनीं शेक्सपीयरच्या जूलियस सीझर नामक नाटकांतील ऍन्टनी आणि ब्रूटस यांचीं रोमन लोकांस उद्देशून झालेलीं भाषणें वाचावीं, अशी आमची त्यांस फार शिफारस आहे. हीं भाषणें नुसतीं उत्तम आहेत, इतकेंच नव्हे तर तीं आज मित्तीस अगदीं जगमान्य होऊन बसलीं आहेत.

बहुमानार्थ भाषणें.—शिष्टादिकांचा आदरपूर्वक सन्मान करते वेळीं जें भाषण करावयाचें, तें गौरवून गोड असें झालें पाहिजे. आतां ही एक प्रकारची हांजीहांजीच आहे. परंतु ती करतां येणें देखील थोडेंसें कठिण काम आहे. ती गैरशिस्त आणि दांभिक अशी न दिसूं देणें, हेंच मुख्य कठिण काम आहे.

भाग ५ वा.

व्याख्यानाची शैली, आणि त्याची जुळणी.

एखाद्या वक्त्याच्या मनांतून इतरांस जें काय सांगावयाचें तें त्याचें त्यास समजलें आहे असें गृहीत धरून, त्याच्या भाषणाची शैली आणि जुळणी कशी असावी, याचा आतां आपणास येथें विचार करणें आहे. तेव्हां त्याविषयीं प्रथम स्थूलमानानें सांगून नंतर भागाभागाचा विचार करूं.

हेत्वैक्य.—मोठमोठे ग्रंथकार देखील कबूल करतात, कीं विषयामध्यें मुख्य मुद्दा म्हटला ह्मणजे अव्वलपासून अखेरपर्यंत एक हेतु कायम ठेवणें हा आहे. तो हेतु आपल्या सर्व भाषणाचा मध्यबिंदू कल्पून, त्यास धरून व्याख्यानचक्रांतील सर्व विचार असावे; किंवा दुसऱ्या तऱ्हेनें म्हटलें तर, त्या भाषणापासून कांहीं तरी एक 'इतिकर्तव्यता' सिद्ध झाली पाहिजे, व आपल्या मुखांतून जे शब्द किंवा वाक्यें निघतील, तीं इतिकर्तव्यतेचीं द्योतक असलीं पाहिजेत, ह्मणजे त्यांपासून ऐकणारास आपल्या मुख्य हेतूचा बोध झाला पाहिजे. भाषणामध्यें वाजवीपेक्षां फाजील कांहींएक नसावें; ह्मणजे व्याख्यानाची अशा प्रकारची जुळणी असावी, कीं तींतील एखादा भाग चुकून सुटून गेला, कीं सर्व विषयाचा बिघाड होऊन जावा. अशा प्र-

कारची विषयाची जुळणी असली ह्मणजे तींत शेवटपर्यंत हेतूचें ऐक्य राहतें. ज्यानें मुख्य हेतु साधण्यासारखा नसतो, असा भाषणाचा कांहीं भाग असेल, तर तो मुळींच वर्ज करावा, असें सिसेरोचें ह्मणणें आहे. परंतु पुष्कळ वक्त्यांचें भाषण ह्या नियमास धरून नसतें. त्यांची व्याख्यानसरणी अशी कांहीं चमत्कारिक असते, कीं तीवरून त्यांच्या मनांतील मुख्य उद्देश मुळींच कळून येत नसतो. अर्थात् त्यांच्या मनांत कांहीं हेतु असल्याखेरीज ते बोलत नसतील हें उघड आहे; पण तो हेतु लोकांपुढें मांडतांनां ते इतक्या कांहीं निरर्थक आणि अप्रासंगिक गोष्टी निवेदन करीत बसतात, कीं त्यायोगानें त्यांचा हेतु झांकला जाऊन, श्रोत्यांस कळेनासा होतो.

सरणी किंवा **जुळणी**.—हेतू प्रकट करण्याकरितां जें सांगावयाचें त्याचा त्या हेतूशीं संबंध असून, तें विचारांचें असावें, इतकेंच नव्हे, तर तें योग्य ठिकाणीं सांगावें, भलत्याच ठिकाणीं सांगूं नये. आणि एवढ्याचकरितां विषयाची जुळणी चांगल्या प्रकारची झाली पाहिजे असते. ती न झाल्यानें गलबतास सुकाणूं नसलें, ह्मणजे तें जसें भलतीकडे भटकत जातें, तसा वक्ता अगदीं गोंधळून जाऊन, विषय सोडून भलतेंच बोलत बसतो. त्याच्या त्या बोलण्यांत पूर्वापर संबंध मुळींच राहत नाहीं. अंधाऱ्या रात्रीं अपरिचित प्रदेशांत प्रवासी गेला असतां ज्या दिशेला वास्तविक जावयाचें, ती दिशा माहीत नसल्यानें जिकडे वाट फुटेल तिकडे ज्याप्रमाणें तो जातो आणि फसतो, तद्वत् आमच्या या वरील वक्त्याची स्थिति होऊन जात

असते. याच्या स्पष्टीकरणार्थ ॲडिसन यानें आपल्या स्पेक्टेटर नामक ग्रंथांत एक लेख लिहिलेला आढळतो, त्याचा उतारा खालीं मराठींत दिला आहे. त्यानें हा लेख वक्तृत्वविषयासंबंधानेंच जरी केवळ लिहिलेला नसला, तरी त्यांतील बराच भाग आपल्या प्रस्तुत विषयास चांगला लागू पडत आहे; याकरितां त्याकडे विद्यार्थ्यानें अवश्य लक्ष पुरवावें, असें आमचें त्यास अगत्यानें सांगणें आहे. तो म्हणतो:—'विषयामध्यें अनियमितपणा किंवा अव्यवस्था असलेली जाड्या विद्वानांसच शोभते. कारण-त्यांचें ज्ञान-भांडार इतकें ओतप्रोत भरलेलें असतें, कीं त्यांच्यानें ते नियम सहसा पाळले जात नाहींत; आणि ह्मणूनच ते आपलीं मुक्ताफळें मालारूपानें सूत्रांत ग्रथित करून ती माला वाचकांस अर्पण करण्याच्या भरीस न पडतां, त्यांच्या राशीच्या राशी जशाच्या तशाच त्यांच्यापुढें ओतितात. यामुळें त्यांच्यांत पद्धतीची उणीव अशी दिसून येत नाहीं. लिहिण्याच्या कामांत काय, किंवा बोलण्याच्या कामांत काय, पद्धत ही एक अजब चीज आहे. बोलणारास व लिहिणारास, दोघांनाही एक पद्धत धरून चालल्यास विशेष फायदा आहे. लिहिण्यांत कांहीं एक पद्धत ठेवल्यापासून ग्रंथकारास नवीननवीन कल्पना आणि युक्ती लढविण्यास मोठें साहाय्य होतें. व्याख्यानविषयाचा नकाशा तयार करून ठेवला, ह्मणजे प्रत्येक बाबतींत त्याला जसे विचार सुचूं लागतात, तसे तो विषयाचा स्थूलमानानें विचार करूं लागला असतां सुचत नाहींत. शिवाय ह्या वेळेस त्याचे विचार एकामागून एक प्रौढ निघत असतात, व ते योग्य

ठिकाणीं सांगितल्यानें त्यांपासून अर्थबोध चांगला हो-ऊन वाचकांस त्यांतील मर्म किंवा खुबी कळते, तशी ते व्यवस्थेशीर जुळणी न करतां सांगितल्यानें कळत नाहीं. त्यांचा सर्व घोंटाळा होऊन अर्थ दुर्बोध होतो; आणि जेथें जें वाक्य घालावयाचें, तेथें तें न घातल्यानें वाचकांस तें न कळून त्यांच्या मनाचा अगदीं घोंटाळा होऊन जातो. चित्रामध्यें योग्य ठिकाणीं योग्य रंग भरल्यानें त्यास जशी शोभा येऊन, तें फार खुबीदार दिसतें, तद्वत् विष-यांत पद्धत ठेविल्यानें, त्यांतील प्रत्येक विचार मोठा सुंदर आणि खुबीदार असा दिसतो. वाचणारा आणि बोल-णारा यांनाही लिहिणाराप्रमाणेंच एक पद्धत ठेवल्यापासून फायदा आहे. विषयरचना चांगली झाली असली, ह्मणजे वाचकाची लवकर समजूत पटून, आनंदानें त्यांतील गोष्टी ग्रहण करण्यास तो तयार असतो, व त्या पुष्कळ दिवस-पर्यंत त्याच्या स्मरणांत जशाच्या तशा कायम राहतात. लिहिण्याला जशी पद्धत अवश्यक आहे, तशी बोलण्यालाही आहे. बोलणाराचा मात्र, आपलें बोलणें लोकांना कळावें, असा हेतु असला पाहिजे. चहाकॉफी घेण्याचे गृहामध्यें माझी रोज एक खेप होत असते. तेथें हजारों प्रकारचे वादविवाद चालतांनां मी पाहतों, परंतु माझ्या देशबांधवां-मध्यें मला पद्धत ह्मणून कांहीं आढळून आली नाहीं, ही त्यां-च्यांत मोठी उणीव आहे. राजकीय विषयांची चर्चा ज्या ठिकाणीं चालते, तेथेंही ज्याची पद्धतवार सुव्यवस्थित चर्चा चालू आहे, असा फार काय पण दहांत एकदेखील विषय सांपडणें मुष्कील पडतें! तेथें कशींबशीं पहिलीं तीन

वाक्यें, विषयास धरून आणि संगतवार अशीं, फार झालें तर निघत असतील, पुढें सर्व विचकाच; पद्धत सुटून पुष्कळ असंबद्ध भाषण तेथें चालत असतें. तेथील तसा प्रकार पाहून मला कटलफिश नांवाच्या माशाची आठवण होते. तो, आपण सुटत नाहीं असें पाहून, सभोंवताली असलेलें पाणी हालवूनहालवून अगदीं गढूळ करून टाकतो, ह्मणजे तो मुळींच दिसेनासा होतो. ज्या मनुष्याला आपले विचार शिस्तवार सांगतां येत नाहींत, त्याला त्याची नुसती बडबड पाहून 'रिकामें पांडित्य; पानें रग्गड आहेत, पण फळ कोठें ?' असें लोकांकडून ह्मणून घ्यावें लागतें. बोलण्यांत असंबद्धता होऊं लागली, ह्मणजे वक्त्याच्या मुख्य विषयाचें अनुमान श्रोत्यांस करितां येत नसतें. मूळांत पद्धत ठेविली नसल्यानें मुख्य विषय एकीकडेस राहून, वक्ता भलतेंच बरळूं लागतो.'

भाषेची पद्धत किंवा शैली आपल्या योग्यतेला व आपले जे श्रोते असतील त्यांच्या मोठेपणाला शोभेल, आणि जेणेंकरून आपला इच्छित मनोरथ प्राप्त होईल, अशी हरएक वक्त्यानें नेहमीं धरीत जावी, हें सयुक्तिक दिसतें. पण पुष्कळ वक्ते ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात, हें चांगलें नाहीं. वाक्याची ओढाताण करून, कृत्रिम रीतीनें तें चांगलें दिसण्याचा कधींहीं प्रयत्न करूं नये. आपण आपलें भाषण पुष्कळ परिश्रम घेऊन तयार केलें आहे, असें दिसूं देऊं नये. एवढ्याकरितां आपल्या भाषापद्धतींत थोडासा निष्काळजीपणा दाखवावा, ह्मणजे आपण आपलें भाषण घराहून चांगलें तयार करून आलों आहों, असें

ऐकणारास सकृद्दर्शनीं वाटणार नाहीं. असें करण्याविषयीं प्राचीन काळच्या मोठमोठ्या वक्त्यांचीही संमति असे, असें दिसतें. पुस्तकांत लिहिलेली भाषा बोलण्यांत कांहीं एक उपयोगाची नाहीं. बोलण्याच्या आणि लिहिण्याच्या भाषेंत जमीनअस्मानाचें अंतर आहे, हें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं. बोलण्यामध्यें आपल्याला पुष्कळ गोष्टींचें स्वातंत्र्य असतें, कोणत्याही गोष्टीचा संकोच नसतो; तसें लिहिण्यांत नसतें. लिहिण्यांत पुष्कळ गोष्टींचा विचार करावा लागतो. आपण लिहितों हें व्याकरणशुद्ध आहे, कीं अशुद्ध आहे, हें पाहावें लागतें; फाजील मजकूर असेल तो गाळून विषय मर्यादित करावा लागतो. द्विरुक्ति न होईल असें करण्याविषयीं फार काळजी घेणें अवश्य असतें. भाषा प्रगल्भ आणि कमावलेली अशी निघण्यास पुष्कळ झटावें लागतें. अशा एक कां अनेक गोष्टींचा विचार लिहितांनां करावा लागतो. बोलण्यांत वाटेल तशी अत्यंत सोपी भाषा जरी उपयोगांत आणिली तरी चालते. बोलण्याच्या भाषेला लिहिण्याच्या भाषेइतकीं नियमबंधनें नसतात. द्विरुक्ती करण्याचा प्रसंग तर नेहमीं पडतो. लिहितांनां अर्थाला जोर येण्याकरितां, जे शब्द किंवा जीं वाक्यें आपण कंसांत घालतों, त्यांचा बोलण्यांत तशा प्रकारें उपयोग केला असतां, भाषण जास्त खुबीदार दिसतें, व त्यांत जोरही तसाच येतो. ऐकणारापेक्षां वाचकास एक मोठा फायदा आहे, तो असा कीं जी गोष्ट आपल्याला पूर्णपणें समजली नाहीं, ती वाचकास पुनःपुनः पुस्तकांत पाहतां येते, तसें ऐकणाराचें नाहीं. वक्त्याच्या बोलण्याकडे त्यानें अंमळ कां दुर्लक्ष

केलें, कीं गेलें तें निघून. त्यास तें पुन्हां ऐकावयाला किंवा पाहावयाला मार्ग नसतो. वक्ता आपण होऊन जर तें वाक्य पुन्हां बोलेल, तरच त्यास तें कळणार आहे, एरवीं नाहीं. श्रोते असावधानचित्त असण्याचा बराच संभव असल्यामुळें वक्त्याला बोलतांनां तोच तो विचार पुनःपुनः भिन्न भिन्न शब्दांनीं प्रकट करावा लागतो. वस्तुतः व्याख्यान चांगलें वाचतां येऊं नये; आणि जें असें वाचतां येतें, तें चांगलें व्याख्यान असें ह्मणतां येत नाहीं.

बोलतांनां देखील निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळी भाषापद्धती घ्यावी लागते. दोघांतिघांत जें संभाषण चालतें, त्याची भाषा कांहीं निराळीच असते; मोठ्या जनसमूहासाठीं भाषा वेगळी; आणि लिहितांनां त्या दोहोंपेक्षां अगदीं भिन्न अशी पद्धत धरावी लागते. ह्या प्रत्येकीस निरनिराळें बुद्धि-कौशल्य खर्चावें लागत असतें, आणि एक पद्धत सोडून दुसरी घ्यायची, ह्मणजे एकींतले कांहीं गुण टाकावे लागतात, कांहीं घ्यावे लागतात, व कांहीं नवीन घालावे लागतात. असें पहा, कीं मनुष्य आपल्या इष्टमित्राशीं बोलत असतांनां, बोलण्याच्या नियमांची कांहीं पर्वा करतो का? त्याला शुद्धाशुद्धतेची त्या वेळेस फारशी भीति नसते, यामुळें तो त्यांची तितकी जरूरही ठेवीत नाहीं, कशा तरी वांकड्यातिकड्या रीतीनें तो आपल्या मनांतील हेतू त्यास कळवीत असतो. परंतु जनसमूहापुढें व्याख्यान देण्याचा प्रसंग त्यास येऊं द्या, ह्मणजे पहा, त्याचें विचारचक्र जरा जोरावत जाऊन, समाजपद्धतीच्या ग्राह्याग्राह्यतेच्या विचारांत तो घुटमळून गेल्यासारखा

दिसेल. त्याच्या जिवाची इतकी गडबड होऊन जाते, कीं त्या वेळेस त्याच्या मुखावाटे जे शब्द निघतात, ते इतके घाईनें आणि अस्पष्ट निघालेले असतात, कीं कित्येक वेळां ऐकणारास त्यांचा अर्थबोध होणें देखील कठिण पडतें. कधीं कधीं तर त्याचा आवाज उतरून बसल्यासारखा होतो; किंवा मधल्यामध्येंच चिरकतो. अशी त्याची मोठी त्रेधा उडून जाते. बोलण्यापेक्षां लिहितांनां कांहीं निराळ्याच दिशेकडे त्याचें विचारचक्र फिरत असतें. त्याच्या विषयरूपी वनामध्यें सुंदर अशी वाक्यवाहिनी संचार करीत असते. त्याच्या ग्रंथवृक्षाचीं पानें हजारों दृष्टांतरत्नांनीं शोभायमान झालेलीं दिसत असतात. आवेशाच्या भरांत आलेल्या मनुष्याचें भाषण देखील असेंच जीवदार आणि जोराचें निघत असतें. त्याच्यावर क्रोधाचें दडपण पडून त्याचा आवाज इतका फुगलेला आणि कांपरा निघतो, कीं त्यायोगानें त्याचे शब्द सहजीं एखाद्या ओबडधोबड वाद्याच्या सुराप्रमाणें कानाला भासतात; मात्र त्यांत गाण्याचें अंग कमी असतें. सृष्टिसौंदर्य डोळ्यानें पाहून जशी मनाची खात्री आणि समाधान होतें, तसें त्याचें हुबेहुब कागदावर काढलेलें चित्र पाहून, किंवा लिहिलेलें वर्णन वाचून होत नसतें. एखादा मजकूर तोंडानें बोलून दाखविण्यांत जो हेतु असतो, तो तो मजकूर लिहून कळविल्यानें साधत नसतो. एखादी गोष्ट घडते वेळीं जो प्रकार घडला असेल, तो गद्यांत लिहून ठेवतांनां पूर्वीच्या आवेशाच्या भरांत जी बोलाचाली झाली असेल,

व जे शब्द उच्चारले गेले असतील, त्यापेक्षां दुप्पट जोराचे व आवेशाचे शब्द योजले पाहिजेत.

सुबोधता.—व्याख्यानांतील भाषा सरळ, सुरस आणि प्रौढ अशी असावी लागते. याकरितां या तीन्हींविषयीं येथें थोडेंसें सांगितलें पाहिजे. प्रथम सुबोधता किंवा सरळता घेऊं. हा गुण अलंकारिक भाषणांतच असला पाहिजे असें नाहीं, तर यच्चयावत् सर्व प्रकारच्या भाषणांत सुबोधता किंवा सरळपणा हा गुण असलाच पाहिजे. कारण जी भाषा स्पष्ट ह्मणजे तत्काळ समजण्यासारखी नसते, तिची योजना केल्यानें, भाषेचा जो मूळ हेतु, हृद्गत दुसऱ्याला कळविण्याचा, तो तसाच एकीकडे राहतो. श्रोतृसमाजाची ग्राहकता पाहून भाषेत कमजास्त फेरबदल केला असतां हरकत नाहीं. कांहीं विवक्षित मंडळीला जें स्पष्ट आणि सहज समजण्यासारखें असतें, तें दुसऱ्या मंडळीस कळण्यासारखें नसतें. ज्यांचें ज्ञान कोतें आहे, अशांना थोडक्यांत संक्षेपरूपानें एखादी गोष्ट सांगूं ह्मटकें, तर तशा सांगण्यानें त्यांची समजूत पटणार नाहीं. तथापि त्यांची समजूत पटावी ह्मणून फार पाल्हाळिकही भाषण करतां कामा नये. कारण त्यानें त्यांस कंटाळा येणार आहे. तेव्हां अशा प्रसंगीं द्विरुक्ती केली असतां चालणार आहे. मात्र आपले विचार पुनः पुनः सांगतांनां, ते निरनिराळ्या शब्दांनीं सांगत जावें, ह्मणजे भाषण कंटाळवाणें होण्याची फारशी भीति राहत नाहीं.

ह्यासंबंधाची एक सर्वसाधारण चूक होत असते, ती अशी कीं, सामान्य मंडळीची ग्राहकशक्ती न पाहतां, कि-

त्येक आपल्या भाषणांत उगीच मोठमोठाले शब्द घालीत असतात. परंतु मोठमोठे शब्द घालण्यांत कांहीं खरें वक्तृत्व नसतें. उलट वक्तृत्वाचा जो मुख्य हेतु तो त्यापासून मुळींच साधत नसतो. सामान्य जनसमूहास शुद्ध आणि साधी मराठी भाषा जितकी चांगली समजेल, तितकी तीमध्यें जाड्या शब्दांची भेसळ केली असतां समजणार नाहीं. अशा मंडळीला ह्मटलें ह्मणजे अगदीं साधी आणि सोपी भाषा समजण्यासारखी असते. तथापि तींत प्रौढता आणि थोडासा अलंकारही असावा लागतो, ह्मणजे त्यांना ती गोड लागते. मंडळी जरी अविद्वान् असली तरी त्यांना भाषागौरव आणि अलंकार यांची अभिरुचि असतेच; आणि भाषेच्या सुबोधतेला किंवा सरळपणाला अलंकारानें ह्मणजे कांहीं बाध येतो असें नाहीं. सर्व अर्थालंकारांत उपमा किंवा रूपकालंकार श्रेष्ठ आहे. याचा नेहमीं उपयोग पडतो. शिवाय रूपकानें अर्थबोधही पण तेव्हांच होतो. एखाद्या गोष्टीचा नुसता भावार्थ सांगत बसण्यापेक्षां, रूपक करून किंवा दृष्टांत देऊन ती सांगितली असतां, अशिक्षित मंडळीलादेखील ती चटकन् कळून त्यापासून त्यांचें एक प्रकारें मनरंजनही होतें.

सरळ भाषा येणें हें कांहीं अंशीं आपल्या वाक्यरचनेवर असतें. आपण जितकी साधी आणि सरळ वाक्यरचना करूं, तितकी आपली भाषाही साधी व सरळ होणार आहे. तीच फार भानगडीची झाली, कीं भाषा तिच्यायोगानें दुर्बोध होणारच. याकरितां वाक्य जितकें लांबलचक आणि घोंटाळ्याचें न करवेल, तितकें करण्याची नेहमीं

काळजी घेत जावी. अशी सावधगिरी ठेवूनही, जर कदाचित् वाक्य मोठें झालेंच, तर त्याची रचना तरी निदान घोंटाळ्याची करूं नये. तें दुसऱ्याच्या कानीं पडतांच, त्यास त्याचा कांहींएक विचार न करतां एकदम अर्थ समजेल, असें करण्याविषयीं जपावें. आपल्या मनांतील विचारांचा एकच एक घोंटाळा होऊन गेल्यानें, ते जागच्या जागीं नीट व्यवस्थेनें बसविले जात नाहींत. यामुळेंही आपल्या भाषणाला दुर्बोधता येते. परंतु विचार नीटनेटके जुळविले असूनही, कित्येकांना ते स्पष्टपणें जगापुढें मांडतां येत नसतात, असेंही कधींकधीं अनुभवास येतें. तेव्हां याचें कारण बहुधा त्यांना ते व्यक्त करून दाखविण्याची खुबी सांधलेली नसावी, हेंच होय.

सरसता.—लोकांचें लक्ष आपल्याकडे ओढून घेण्याला आपण जो कार्यकारणभाव दाखवून बुद्धिवाद करितों, त्यांच्या सत्यतेचा ठसा त्यांच्या मनावर उमटविण्यास, त्यांच्या कल्पना उत्तेजित करण्यास, व त्याचप्रमाणें त्यांच्या मनोवृत्ती जागृत करण्यास, आपल्या भाषणांत सरसता हा गुण असणें अत्यंत अवश्यक आहे; व ती येण्याला मुख्य तीन गोष्टी ध्यानांत धराव्या लागतात. एक शब्दांची निवड, दुसरी शब्दसंख्या आणि तिसरी शब्दरचना. ह्या तिहींचा आपण येथें अनुक्रमानें विचार करूं.

शब्दांची निवड.—शब्दांच्या निवडीविषयीं विचार करतांनां, आर्चबिशप व्हेटले यांनीं ॲरिस्टॉटल्प्रमाणेंच शब्दांचे दोन वर्ग केले आहेत. पहिल्या वर्गांत ज्यांना मूळचा कांहीं अर्थ आहे अशा नेहमींच्या रूढ शब्दांचा

समावेश होतो; आणि ज्या शब्दांना, मग ते शब्द रूढ असोत कीं अप्रयुक्त असोत, मूलार्थ जाऊन त्यापेक्षां अगदीं भिन्न असा अर्थ मिळालेला आहे, किंवा साधारण भाषणाहून निराळ्याच रीतीनें ज्यांचा उपयोग केला जात आहे, असे शब्द दुसऱ्या वर्गांत मोडतात. एकंदरींत प्रचारांतुन गेलेले सर्व शब्द दुसऱ्या वर्गांत गणले आहेत. व्याकरण आणि अलंकारशास्त्र यांवरील ग्रंथकारांच्या मतें, मूलार्थ जाऊन भिन्नार्थ पावलेले सर्व शब्द आणि अलंकार दुसऱ्या वर्गांत येतात.

मूलार्थीं योग्य शब्द.—शब्दाची योग्य निवड करण्याचा मुख्य नियम असा आहे कीं, ज्या शब्दांवरून त्यांचा मूळचा जो खरा अर्थ आहे तो सहज समजण्यासारखा असतो, ते शब्द बहुशः पसंत करावे. भाषण रसयुक्त आणि जोरदार होण्यास असे शब्द जितके उपयोगी पडतील, तितके ठोकळ व भावार्थी शब्द उपयोगी पडणार नाहींत. कारण ठोकळ किंवा भावार्थबोधक शब्दांनीं बोलणें अगदीं फिकें पडतें. तेंच त्या त्या अर्थाचे योग्य शब्द योजल्यानें भाषणांत एक प्रकारचें स्वारस्य येऊन तें मोहक दिसतें, व त्याचा परिणामही तसाच सुंदर होतो. दोन्ही प्रकारच्या शब्दांनीं बोलणाराच्या मनांतील भाव सारखाच प्रकट केला जातो; परंतु पहिल्या प्रकारानें भाषणाला यावा तसा रंग येत नाहीं. त्यांत चित्तवेधकता आणि रस हीं कमी असतात, आणि ह्मणूनच त्या भाषणापासून ऐकणारांच्या मनांवर उमटावा तसा ठसा उमटत नाहीं.